सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक


https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ६९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. ४ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर होताच पंतप्रधान मोदींनी मानले सर्व खासदारांचे आभार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४नवी दिल्ली**

वक्फ दुरुस्ती विधेयक लोकसभा आणि राज्यसभेत मंजूर झाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व खासदारांचं आभार मानले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट करून हे आभार मानले आहेत. या चर्चेत भाग घेणाऱ्या सर्व खासदारांचे आभार. ज्यांनी आपले विचार व्यक्त केले आणि हा कायदा मजबूत करण्यासाठी महत्त्वाचं योगदान दिलं त्या सर्वांचे आभार. संसदीय समितीला आपले अमूल्य संदेश पाठवणाऱ्या अगणित लोकांचेही विशेष आभार. पुन्हा एकदा व्यापक चर्चा आणि संवादाचे महत्त्व अधोरेखित झालं आहे,




असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

अनेक दशकांपासून वक्फ प्रणालीत पारदर्शिकतेचा अभाव होता. त्यामुळे विशेष करून मुस्लिम महिला, गरीब मुसलमान आणि पसमांदा मुसलमानांच्या हिताचं त्यामुळे मोठं नुकसान व्हायचं. आता संसदेने पारित केलेल्या कायद्यामुळे पारदर्शिकता वाढणार आहे. तसेच लोकांच्या अधिकारांचं रक्षणही केलं जाणार आहे. हा सामाजिक आणि आर्थिक न्याय, पारदर्शकची महत्त्वाची लक्षणे आहेत. बऱ्याच काळापासून वंचित राहिलेल्यांना आता मदत मिळणार आहे. वक्फ बिलामुळे लोकांना संधी मिळणार आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

**दोन्ही सभागृहात विधेयक मंजूर**

संसदेच्या दोन्ही सभागृहात वक्फ दुरुस्ती विधेयक मंजूर झालं आहे. १२ तासाच्या जंबो चर्चेनंतर हे विधेयक लोकसभेत मंजूर करण्यात आलं आहे. या विधेयकाच्या बाजूने २८८ मते पडली. तर विधेयकाच्या विरोधात २३२ मते पडली. त्यानंतर राज्यसभेत या विधेयकावर दीर्घ चर्चा झाली. तब्बल १३ तास राज्यसभेत चर्चा झाल्यानंतर राज्यसभेतही हे विधेयक मंजूर करण्यात आलं. राज्यसभेत विधेयकाच्या बाजूने १२८ तर विरोधात ९५ मते पडली. संसदेच्या दोन्ही सभागृहात विधेयक मंजूर झाल्यानंतर आता हे विधेयक राष्ट्रपतींकडे पाठवण्यात आलं आहे. राष्ट्रपतींचं शिक्कामोर्तब झाल्यानंतर कायदा अस्तित्वात येणार आहे.

**नवी पहाट**

संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी हे विधेयक दोन्ही सभागृहात मंजूर झाल्यावर त्यावर प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. वक्फ दुरुस्ती विधेयक म्हणजे एक नवीन पहाट आहे. राज्यसभेतही वक्फ बिलावर चर्चा झाल्यावर त्यांनी हे विधेयक आजची गरज असल्याचं म्हटलं होतं. या विधेयकामुळे पारदर्शिकता येणार आहे. तसेच जबाबदारीही येणार आहे. या विधेयकाचं नाव उम्मीद असं आहे. उम्मीद या नावाला कुणाचा आक्षेप असू नये. हे विधेयक कोणत्याही धर्माच्या विरोधात नाही, असंही त्यांनी म्हटलंय.

## दीनानाथ रुग्णालयातील घटनेबाबत चौकशी समिती नियुक्त होणार; मुख्यमंत्री फडणवीसांनी दिले आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ मुंबई**

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रकरणी आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी कारवाई केली आहे. रुग्णालयातील घटनेबाबत चौकशी समिती नियुक्त करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. ही समिती या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करणार आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालय प्रशासनाने पैशाच्या हव्यासापोटी उपचारात अडवणूक केल्याने एका गर्भवती महिलेला जीव गमवावा लागल्याची धक्कादायक बातमी समोर आली. पैशांअभावी रुग्णालयाने गेटवरुनच गर्भवती महिलेला परत पाठवल्याने आणि ऐनवेळी रुग्णवाहिका मिळू न शकल्याने महिलेचा नाहक बळी गेला. वेळीच उपचार दिले असते तर महिलेचा जीव वाचला असता, असा संताप राज्यभरातून व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकरणी रुग्णालय प्रशासनावर कारवाई करा अशी मागणी सुरू आहे. आता या प्रकरणी मुख्यमंत्री फडणवीस यांनी चौकशी समिती नियुक्त करण्याचे आदेश दिले आहेत.



रुग्णालयातील प्रकारची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली आहे. या घटनेची चौकशी करण्यासाठी धर्मादाय सहआयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत.

**या अधिकाऱ्यांचा चौकशी समितीमध्ये समावेश**

१) उपसचिव श्रीमती यमुना जाधव,

२) सह कक्षप्रमुख तथा कक्ष अधिकारी, धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, मुख्यमंत्री सचिवालय यांचे प्रतिनिधी,

३) सर जे. जे. रुग्णालय समूह, मुंबईचे अधीक्षक हे सदस्य असतील तर

४) विधि व न्याय विभागाचे उपसचिव/अवर सचिव हे या चौकशी समितीचे सदस्य सचिव असतील.

## वक्फ विधेयकाला समर्थन देताच नितीश कुमारांना धक्का

### विश्वास तोडला म्हणत ५ नेत्यांची जेडीयुला सोडचिठ्ठी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ पाटणा**

लोकसभेनंतर राज्यसभेतही बहुमताने वक्फ दुरूस्ती विधेयक मंजूर करण्यात आलं. लोकसभेत या विधेयकाच्या बाजूने २८८ मते पडली तर विरोधात २३२ एवढी मतं पडली. अल्पसंख्याक कल्याण मंत्री किरेन रिजिजू यांनी लोकसभेत हे विधेयक मांडले होते. त्यानंतर आता हे विधेयक राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी पाठवण्यात येईल आणि त्यानंतर त्याचे कायद्यात रुपांतर होईल. दुसरीकडे, वक्फ दुरुस्ती विधेयकावर बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या जेडीयूने मोदी सरकारला पाठिंबा दिला आहे. मात्र आता नितीश कुमार यांना धक्का देत जेडीयुच्या पाच मुस्लीम नेत्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे.




वक्फ दुरुस्ती विधेयकाच्या मंजुरीनंतर मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या पक्षात खळबळ उडाली आहे. नितीश कुमार यांच्या जनता दल युनायटेडमध्ये बंडखोरी सुरू झाली आहे. पक्षातून एकामागून एक मुस्लिम नेत्यांचे राजीनामे सुरूच आहेत. वक्फ दुरुस्ती विधेयकाला पाठिंबा दिल्याने संतप्त झालेल्या पाच मुस्लिम नेत्यांनी पक्ष सोडला आहे.

वक्फ विधेयकाला पाठिंबा दिल्याने जेडीयूच्या अल्पसंख्याक सेलचे राज्य सचिव मोहम्मद शाहनवाज मलिक, प्रदेश सरचिटणीस सई मोहम्मद, तबरेज सिद्दीकी अलिग, भोजपूरचे पक्षाचे सदस्य मोहम्मद दिलशान रैन आणि मोहम्मद कासिम अन्सारी यांनी पक्षाशी संबंध तोडले आहेत. जेडीयूने मुस्लिम समाजाचा विश्वास तोडला असून हे पाऊल धर्मनिरपेक्ष प्रतिमेच्या विरोधात असल्याचा आरोप या नेत्यांनी केला आहे. मात्र पक्षाने हे दावे फेटाळून लावले आहेत.

जेडीयूने या राजीनाम्यांना विशेष महत्त्व दिले नाही आणि या नेत्यांचा पक्षाशी कोणताही अधिकृत संबंध नसल्याचे म्हटले आहे. जेडीयूच्या जिल्हाध्यक्ष मंजू देवी यांनी म्हटलं की, कासिम अन्सारी यांची आधीच पक्षातून हकालपट्टी करण्यात आली असून ते जेडीयूचे सदस्य नाहीत. याशिवाय जेडीयूच्या तिकिटावर त्यांनी कधीही निवडणूक लढवली नसल्याचेही सांगण्यात आले.

दुसरीकडे, माजी आमदार मौलाना गुलाम रसूल बलियावी आणि जेडीयू आमदार गुलाम गौस यांनीही या मुद्द्यावर आपला निषेध नोंदवला आहे. या विधेयकाद्वारे वक्फ बोर्डाची जमीन हिसकावण्याचा प्रयत्न केला जात असून, त्यामुळे मुस्लिम समाजाच्या कल्याणासाठी सुरू असलेल्या योजनांवर परिणाम होणार आहे.

दुसरीकडे, वक्फ विधेयकाविरोधात कायदेशीर लढा देण्याची तयारीही सुरू झाली आहे. इदरा-ए-शरियाचे अध्यक्ष आणि माजी आमदार मौलाना गुलाम रसूल बलियावी यांनी देशभरातील उच्च न्यायालयांमध्ये या विषयावर कायदेशीर सेलची बैठक होणार असून या निर्णयाला आव्हान दिले जाईल, असं म्हटलं आहे. तसेच अलीगढ येथील जमीयत उलेमा ए हिंद संघटनेचे शहर अध्यक्ष मुफ्ती मोहम्मद अकबर कासमी यांनी सरकारला इशारा दिला आहे. हे विधेयक मुस्लिमांचा धार्मिक अधिकार हिसकावून घेणार आहे. यामुळे मुसलमान रस्त्यावर उतरून त्याचा विरोध करतील. हे आंदोलन स्वातंत्र्याच्या वेळी मुस्लीम रस्त्यावर आले होते तसेच असेल असं कासमी यांनी म्हटलं.

## वक्फची महाराष्ट्रातील ६० टक्के जमीन आहे अतिक्रमणाच्या विळख्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४नागपूर**

संसदेत वक्फ बोर्ड संशोधन बिलावर मंथन सुरू आहे. दरम्यान हाती आलेल्या माहितीनुसार, वक्फची महाराष्ट्रातील ६० टक्के जमीन अतिक्रमणाच्या विळख्यात आहे, एका सर्वेत ही माहिती पुढे आली आहे. या जमिनीला अतिक्रमणाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी फारशी प्रभावी कारवाई झालेली नाही.

**या जागेसाठी आहे वाद**

नागपूरमध्ये वक्फच्या विविध संपत्तींचा वाद चर्चेत आहे. यातील एक प्रकरण सदरमधील एका अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेच्या मैदानाशी जुळला आहे. याशिवाय सतरंजीपुरा मस्जिद कमिटीच्या गोधनी येथील जमिनीचे प्रकरणही चर्चेत आहे. सन २०१६-१७ दरम्यान राज्यातील वक्फ बोर्डाने ताजाबाद दर्गाहची जमीन वक्फची असल्याचा दावा केला होता. हे प्रकरणही बरेच चर्चेत आले होते. नागपुरातील वक्फ बोर्ड कार्यालयात वक्फ संपत्तीच्या नोंदणीचे अनेक प्रस्ताव प्रलंबित आहेत.




**छत्रपती संभाजीनगरात सर्वाधिक मालमत्ता**

वक्फजवळ असलेल्या एकूण जमिनीपैकी सर्वाधिक ५० टक्के जमीन मराठवाड्यात आहे. त्यातही सर्वाधिक संपत्ती छत्रपती संभाजीनगरात असल्याची माहिती सर्व्हेत नोंदवली आहे. त्यानंतर बीड, जालना आणि परभणीतही मोठी संपत्ती वक्फकडे आहे. विदर्भात केवळ नागपूर आणि अमरावतीतच वक्फकडे जमीन आहे. नागपूर शहर आणि जिल्हा मिळून सुमारे ४० ते ५० एकर जमीन वक्फकडे आहे.

**गेल्यावर्षी झाला होता सर्व्हे**

राज्य वक्फ बोर्डचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. वजाहत मिर्झा यांच्या पुढाकाराने गेल्यावर्षी राज्यात वक्फच्या जमिनीसंबंधाने एक महत्त्वपूर्ण सर्व्हे करण्यात आला होता. त्याचा अहवाल वक्फकडे सुरक्षित आहे. सर्व्हेनुसार, राज्यातील वक्फ बोर्डाजवळ असलेल्या जमिनीपैकी सुमारे ६० टक्के जमिनीवर अतिक्रमण आहे. सर्वाधिक अतिक्रमण मराठवाड्यातील जमिनीवर असल्याचा दावा सर्व्हेतून करण्यात आला होता.

## समृद्धीवर पुन्हा अपघात! एकाचा मृत्यू, एक गंभीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४बुलढाना**

पंत प्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण झाल्यापासून लहान मोठ्या अपघातानी हिंदुहृदय सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे दृतगती महामार्ग हा गाजत आहे. अपघातांची ही मालिका चालू वर्षातही कायम आहे.शुक्रवारी, ४ एप्रिल रोजी सकाळी झालेल्या अपघातात एक जण जागीच ठार झाला तर त्याचा सहकारी गंभीर जखमी झाला. जखमीवर नजीकच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु असून त्याची प्रकृती स्थिर असल्याचे रुग्णालय सूत्रांनी सांगितले.

१ एप्रिल पासून समृद्धी वरील टोल वाढविण्यात आला आहे. यातुलनेत उपलब्ध सोयी सुविधा कमीच आहे. दस्तूरखुद्ध नागपूर उच्च न्यायालयाने यावर वेळोवेळी नाराजी व्यक्त केली आहे. असाच प्रश्न महामार्ग नादुरुस्तीचा आहे. मध्यन्तरी दुसरबीड टोल नाक्यापासून कमिअधिक दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या पुलावरील लोखंडी अँगल उखडला होता. यामुळे त्याला धडकून किमान दहा वाहनाचे टायर फुटल्याची घटना काल परवा घडली होती. मात्र टोल नाक्यावर फोन करूनही मदत मिळाली नाही असा आरोप वाहन चालक, वाहन मालकांनी तेंव्हा केला होता. त्यामुळे कोणत्या ना कोणत्या कारणांनी समृद्धी गाजतच राहते हे तेवढेच खरे..



या पार्श्वभूमीवर समृद्धी महामार्गावर दिवसेंदिवस अपघाताचे सत्र सुरूच असल्याचे चित्र आहे. आज,४ एप्रिलला सकाळी किनगाव राजा पोलीस ठाणे हद्दीत समृद्धी महामार्गावर भीषण अपघात झाला. प्रथम दर्शनी चालकाला डुलकी लागल्याने हा अपघात झाला असावा असा प्राथमिक अंदाज आहे. एका भरधाव मालवाहू वाहनाने समोर उभ्या असलेल्या वाहनाला मागून धडक दिली. यात मालवाहू वाहनातील एक जण जागीच ठार तर एक गंभीर जखमी झाला.

जखमी रुग्णाला सिंदखेड राजा येथील शासकीय रुग्णालय मध्ये उपचारसाठी भरती करण्यात आले आहेत. येथे प्राप्त माहितीनुसार समृद्धी महामार्गाच्या नागपूर कॉरीडोरवर हा अपघात झाला. चिकू घेऊन जाणारे मालवाहू वाहन नागपूरकडे जात होते. यावेळी समोरील वाहनाला धडकून अपघात झाला. यात मालवाहू वाहनातील धनंजय गजानन तायडे याचा जागीच मृत्यू झाला. त्यांचा सहकारी प्रथमेश हिम्मतराव लहुरकर (राहणार बार्शीटाकळी, जिल्हा अकोला ) हा गंभीर जखमी झाला आहे.समृद्धी महामार्ग रुग्णवाहिकेने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले.त्याच्यावर उपचार सुरू असून त्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले. घटनेची माहिती मिळताच किनगाव राजा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह उत्तरिय तपासणीसाठी पाठवण्यात आला आहे.

## ई-बाइक टॅक्सीला विरोध, धोरणामध्ये सुसूत्रता नसल्याचा रिक्षा-टॅक्सी संघटनांचा आक्षेप

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ४मुंबई**

राज्य मंत्रिमंडळाने नुकतीच ई-बाइक टॅक्सीला परवानगी दिली असली तरी त्याला रिक्षा-टॅक्सी संघटनांनी विरोध दर्शवला आहे. तसेच धोरणामध्ये सुसूत्रतेचा अभाव असून, याच्या अंमलबजावणीबाबत संघटनांकडून शंका उपस्थित केली जात आहे.

राज्यातील किमान एक लाख लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये आता ई-बाइक टॅक्सी धावणार आहे. परंतु मुंबई शहर आणि उपनगरामध्ये जेथे अगोदरच लाखोंच्या संख्येने रिक्षा-टॅक्सी उपलब्ध आहेत, तसेच मेट्रो, रेल्वे, बेस्ट सारख्या सुविधा असल्याने ई-बाइक टॅक्सीची



गरज नसल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. महानगरात ३० लाखांपेक्षा जास्त बाईक असून ई-बाइक टॅक्सीमुळे गाड्यांची संख्या वाढून वाहतूक कोंडीत भर पडणार आहे. सध्या इलेक्ट्रिक तसेच इतर बाइक चालकांकडून नियम पाळले जात नसताना आता ई-बाइक टॅक्सीचालक असे नियम पाळतील का, असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे.

**मंत्रिमंडळाने धोरणाचा निर्णय परस्पर घेतला**

ई-बाइक टॅक्सी धोरण बनविताना झा समितीला संघटनांनी काही सूचना तसेच आक्षेप सादर केले होते. मात्र धोरण जाहीर करतेवेळी मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय परस्पर घेण्यात आला. बाईक टॅक्सीमुळे महाविद्यालयीन तरुणांसाठी रोजगार उपलब्ध होणार असला तरी त्यांच्या शिक्षणावरही प्रभाव पडणार असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.

## ईडीने नऊ महिने आत ठेवलेल्यांनी बोलताना भान ठेवावे : राष्ट्रवादीचा प्रवक्ता राऊतांवर बरसला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

बाबरी मस्जिद शिवसैनिकांनी पाडली याचा अभिमान आहे असं बाळासाहेब ठाकरे म्हणत होते मात्र आता शिवसेना काँग्रेसच्या चरणी संजय राऊत यांनी अर्पण केली आहे. आम्ही पण तसे शब्द वापरू शकतो पण आमच्यावर ते संस्कार नाही. पत्राचल आणि ईडीमध्ये ९ महिने आत राहिलेल्याने बोलताना भान ठेवावे अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनी आज माध्यमांशी बोलताना शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर केली.

खासदार संजय राऊत यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार आणि जेष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांच्यावर जोरदार टीका केली होती या टीकेला प्रत्युत्तर म्हणून आज माध्यमांशी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते आनंद परांजपे यांनी संजय राऊत यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. यावेळी त्यांनी वक्फ विधेयकावर राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका स्पष्ट करत संजय राऊत यांच्यावर हल्लाबोल केला.यावेळी आनंद परांजपे म्हणाले की, शिव शाहू आंबेडकरांची विचारधारा आम्ही सोडली नाही. वक्फ प्रॉपर्टी नियोजन करण्यासाठी आणि पारदर्शकता आणण्यासाठी सरकारने विधेयक आणले आहे आणि प्रॉपर्टी चांगल्या पद्धतीने मॅनेजमेंट व्हावे, रोजगार शिक्षण




यांच्यासाठी वापर व्हावे यासाठी विधेयक सरकारने विधेयक आणले आहे असं आनंद परांजपे म्हणाले. तसेच राष्ट्रवादीने विधेयकाच्या बाजून भूमिका घेतली आहे पण शिवसेना उबाठा ही मात्र गोंधळलेला परिस्थितीत आहे. असेही यावेळी आनंद परांजपे म्हणाले.

तसेच दाऊद प्रकरणात प्रफुल पटेल यांची चौकशी पण झाली नाही मात्र स्वतः मात्र बेलवर बाहेर आहे असा टोला देखील त्यांनी यावेळी संजय राऊतांना लावला. तसेच रोज जे शिवसेनेचे पतन होत आहे याच्या वैफल्यातून संजय राऊत यांच्या मानसिक संतुलन बिघडले असल्याची टीका देखील त्यांनी माध्यमांशी बोलताना केली. तर वक्फ विधेयकेवर मतदान होत होते तेव्हा पवार साहेब का गैरहजर होते? ही न कळण्याइतके लोक मूर्ख नाही असेही ते म्हणाले.

संपादकीय ......

# तांब्याच्या झळाळीचा पुरवठ्यावर परिणाम

*अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी तांब्यावर टॅरिफ (आयात कर) लावण्याच्या संभाव्य निर्णयामुळे जागतिक बाजारात तांब्याच्या किमती १० हजार प्रतिटनाच्या पुढे गेल्या आहेत. तांब्याचा वापर केवळ इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स उद्योगापुरता मर्यादित नसून, तो नव्या ऊर्जा उद्योगासाठीही महत्त्वाचा घटक बनला आहे. ट्रम्प यांच्या या धोरणामुळे व्यापारी मोठ्या प्रमाणात तांबे अमेरिकेत पाठवत आहेत. परिणामी, अन्य बाजारपेठांमध्ये पुरवठ्यावर मोठा परिणाम होत आहे.*

*तांबे हा एक महत्त्वाचा औद्योगिक धातू असून तो जागतिक अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचा घटक मानला जातो. इलेक्ट्रॉनिक्स, बांधकाम, वाहतूक आणि नवनवीन हरित तंत्रज्ञानासाठी तांबे अत्यंत उपयुक्त आहे. भारत आणि जागतिक स्तरावर तांब्याची मागणी सातत्याने वाढत आहे. जगभरात तांब्याचे सर्वाधिक उत्पादन चिली या देशात होते. जागतिक उत्पादनाच्या सुमारे २७ ते ३० टक्के तांबे चिलीमध्ये तयार होते. पेरू हा देश याबाबत दुसर्या क्रमांकावर आहे. भारताचा शेजारी असणारा चीन हा तांब्याचा मोठा उत्पादकही आहे आणि सर्वात मोठा ग्राहकही आहे. तांब्याच्या एकूण जागतिक मागणीत चीनचा वाटा सुमारे ५० टक्के आहे. डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगोही तांब्याच्या साठ्यांसाठी प्रसिद्ध आहे. चीनप्रमाणेच अमेरिका आणि ऑस्ट्रेलिया हे देश तांब्याच्या उत्पादनात आणि निर्यातीत आघाडीवर आहेत. तांब्याच्या किमती या लंडन मेटल एक्स्चेंज (एलएमई) आणि कॉमेक्स येथे ठरतात. मागणी-पुरवठा तत्त्वावर ही किंमत ठरते. भारतात तांब्याचे मोठे साठे राजस्थान, मध्य प्रदेश आणि झारखंडमध्ये आहेत. मध्य प्रदेशात मालांजखंड येथे तांब्याची देशातील सर्वात मोठी खाण आहे. तसेच क्हेत्री (राजस्थान) आणि घाटशिला (झारखंड) येथेही तांब्याच्या प्रसिद्ध खाणी आहेत. भारत २०१८ पूर्वी तांब्याचा निर्यातदार होता; पण स्टरलाईट कॉपर कारखाना बंद झाल्यामुळे भारत तांबे आयातदार बनला.*

*ट्रम्प यांनी अमेरिकेच्या खाण उद्योगाला चालना देण्याच्या हेतूने तांब्याला त्यांच्या देशांतर्गत खनिज धोरणात केंद्रस्थानी ठेवले आहे. त्यांच्या आदेशानुसार, देशांतर्गत तांबे उद्योग वाढवण्यासाठी आयातीच्या राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित परिणामांचा आढावा घेतला जात आहे. अमेरिकेकडे भरपूर तांबे साठा असला, तरी आपल्या स्मेल्टिंग आणि रिफायनिंग क्षमतांमध्ये जागतिक स्पर्धकांच्या तुलनेत मोठी तफावत आहे, असे या आदेशात नमूद करण्यात आले आहे. भारतामध्ये तांब्याचे उत्पादन अपुरे असून, देशाच्या वाढत्या मागणीच्या तुलनेत स्थानिक उत्पादन कमी आहे. यामुळे भारत तांब्याबाबत आयातीवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. भारतातील बहुराष्ट्रीय उद्योग समूह जेएसडब्ल्यू ग्रुप ओडिशा राज्यात २०२८-२०२९ पर्यंत ५००,००० टन क्षमतेचा तांबे स्मेल्टर प्रकल्प उभारण्याच्या तयारीत आहे. यासाठी पेरू आणि चिलीमधून तांब्याचा पुरवठा होणार आहे. या प्रकल्पासाठी सुमारे १२,००० कोटींची गुंतवणूक होईल.*

*आदित्य बिर्ला ग्रुपचे अध्यक्ष कुमार मंगलम बिर्ला यांनी हिंदाल्कोसाठी ४५,००० कोटी गुंतवणुकीची घोषणा केली. बिर्ला म्हणाले, आम्ही ॲल्युमिनियम, तांबे आणि स्पेशाल्टी ॲल्युमिना व्यवसायात ही गुंतवणूक करत आहोत. यामध्ये अपस्ट्रीम आणि उच्च प्रेसिजन अभियांत्रिकी उत्पादने विकसित करण्यावर भर असेल. हिंदाल्को कंपनी ॲल्युमिनियम, तांबे आणि स्पेशाल्टी ॲल्युमिना उत्पादनांमध्ये जागतिक स्तरावर आघाडीवर आहे. तांबे हा लिथियम आणि कोबाल्ट इतकाच महत्त्वाचा धातू असून, तो रिचार्जेबल बॅटरी, मोबाईल फोन, एलईडी लाईटस्, फ्लॅट-स्क्रीन टीव्ही, तसेच इलेक्ट्रिक वाहने आणि ऊर्जा संक्रमण तंत्रज्ञानासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. भारत सरकारने २०२३ मध्ये तांब्याला ३० महत्त्वाच्या खनिजांमध्ये समाविष्ट केले आहे.*

*भारतात २०१८ मध्ये वेदांता कंपनीच्या स्टरलाईट कॉपर स्मेल्टरच्या बंदीनंतर तांब्याच्या आयातीमध्ये मोठी वाढ झाली. सध्या फक्त हिंदाल्को इंडस्ट्रीज आणि हिंदुस्थान कॉपर या दोन मोठ्या कंपन्या तांबे उत्पादन करतात. अदानी ग्रुपने २०२३ मध्ये १०,००० कोटींचा कच्छ येथे तांबे स्मेल्टर प्रकल्प सुरू केला असून, तो पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यावर देशाला तांब्याच्या आयातीवर अवलंबून राहावे लागणार नाही. भारताची वार्षिक शुद्ध तांबे उत्पादन क्षमता सुमारे ५.५५ लाख टन आहे, तर मागणी ७.५ लाख टनांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे भारताला सुमारे ५ लाख टन तांबे दरवर्षी आयात करावे लागते. उद्योगतज्ज्ञांच्या मते, २०३० पर्यंत भारताची तांब्याची मागणी दुप्पट होण्याची शक्यता आहे.*

*भारतातील तांबे उद्योगाला मोठी संधी असून, देशातील उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी खासगी व सरकारी गुंतवणुकीत वाढ होणे आवश्यक आहे. आदित्य बिर्ला ग्रुप आणि गडथ ग्रुपसारख्या मोठ्या उद्योग समूहांनी तांब्याच्या क्षेत्रात केलेल्या गुंतवणुकीमुळे भारताच्या स्वावलंबनाच्या दिशेने महत्त्वाची पावले उचलली जात आहेत. सरकारने आणि उद्योग क्षेत्राने मिळून स्थानिक तांबे उत्पादन वाढवले, तर भारत भविष्यात तांब्याच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करू शकेल आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक होऊ शकेल. यासंदर्भात अलीकडील काळात समोर आलेली माहिती महत्त्वाची आहे. यानुसार तांब्याच्या खाणी कोरड्या पडण्याचे प्रमाण वाढत आहे. याचा अर्थ येणार्या काळात तांब्याचे उत्पादन कमी होत जाणार असून वापर वाढत जाणार आहे. परिणामी, तांब्याचे भाव हे सतत वाढत राहणार आहेत. सौर आणि वारा ऊर्जा प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणावर तांबे वापरले जाते. इलेक्ट्रिक गाड्यांमध्ये पारंपरिक गाड्यांच्या तुलनेत तिपटीहून अधिक तांबे लागते. तांब्याचे जगभरातील साठे मर्यादित असून अनेक खाणी जवळपास संपत आल्या आहेत. नवीन खाणी शोधणे आणि त्यांच्यावर प्रक्रिया करणे खर्चिक व वेळखाऊ आहे. त्यामुळे भविष्यात तांब्याचे दर मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता आहे.*

# एच आई व्ही नियंत्रण समिती ची सभा संपन्न

## एच आय व्ही कार्यक्रमात जिल्ह्याची वाटचाल योग्य मार्गाने - जिल्हाधिकारी कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती,** जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा सामान्य रुग्णालय अंतर्गत चालविल्या जास्त असलेल्या क्खत कार्यक्रमाचा आढावा जिल्हाधिकारी कार्यालय येथील महसूल भवन येथे दिनांक २ एप्रिल रोजी घेताना मा. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी एच आय व्ही प्रतिबंध व नियंत्रण कार्यक्रमाचा आढावा घेताना जिल्हा कार्यक्रमात योग्य दिशेने वाटचाल करीत असल्याचे प्रतिपादन केले तसेच एच आय व्ही कार्यक्रमतील हस्तक्षेप लक्ष्यगट व संक्रमित व्यक्तींना सर्व प्रकारच्या सुविधा प्रशासना च्या माध्यमातून देण्याच्या सूचना करण्यात आल्या या सभे च्या सुरवातीला आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या एच आई व्ही कार्यक्रमाच्या आढावा मा. अध्यक्ष तसेच प्रामुख्याने उपस्थित मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती, यांनी घेतला तेव्हा जिल्हा शल्य चिकित्सक डॉ दिलीप सौंदळे सदस्य सचिव जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण समिती, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सुरेश आसोले, जिल्हा कार्यक्रम अधिकारी अजय साखरे, यांनी सर्व प्रश्नांचे निराकरण केले.या वेळी राष्ट्रीय स्तरावरून दिल्या जाणाऱ्या उद्दीष्ट ज्या मध्ये रक्तदान तसेच एच आई व्ही संबंधित इतर बाबीचा आढावा घेण्यात आला या मध्ये जिल्ह्याचा कामाबद्दल मा. जिल्हाधिकारी यांनी समाधान व्यक्त केले तसेच काही सूचना दिल्या.या दरम्यान इतर कार्यक्रम जसे क्षय रोग नियंत्रण कार्यक्रम, आई पासून बाळाला एच आय व्ही होन्याची तसेच सिफिलिस होण्याची शक्यता असलेल्या कार्यक्रम, जिल्ह्यातील विशेष घटकतील व्यक्तीच्या समस्या असलेल्या समिती व कार्यक्रम इत्यादी चा आढावा घेण्यात आला.

सदर सभेमध्ये अध्यक्ष मा.जिल्हाधिकारी सौरभ कटियार होते, उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती श्रीमती संजिता महापात्रा, तर सदर समिती चे सचिव जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, डॉ.सुरेश आसोले जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ विनोद पवार वैध्यकीय अधीक्षक जिल्हा स्त्री रुग्णालय, जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्री अजय साखरे, डॉ. आर व्ही बनसोड जिल्हा क्षयरोग अधिकारी, गजानन कोचूरवार जिल्हा माहिती अधिकारी सीमा भाकरे महिला व बालकल्याण अधिकारी, डॉ पद्माकर सोमवंशी संचालक, डॉ आशिष वाघमारे रक्त सक्रमण अधिकारी, प्रणिता भाकरे समन्वयक स्त्री भ्रूण हत्या नियंत्रण कार्यक्रम, डॉ जी. जे. म्हाला, निलेश कटके, अवतार सिंग चव्हाण पोलीस निरीक्षक, डॉ फिरोज खान शहरी क्षय रोग अधिकारी, डॉ रुपेश खडसे प्रतिनिधी महानगर पालिका, प्रियांका चौधरी पोलीस निरीक्षक, किरण तायडे, स्वाती कोहे, आचल चव्हाण, श्रीमती विद्या तायडे, श्री. ब्रिजेश दळवी, श्री. प्रकाश शेगोकर, श्री. पी.खडसे, श्री. दामोदर गायकवाड, श्री. परमेश्वर मेश्राम, श्री राजेश तूपोने, श्री लोकेश पवार जिल्हा कार्यक्रम सहाय्यक यांच्या सोबत शासकीय विभाग तसेच सामाजिक संस्थांनाचे प्रतिनिधी हजर होते.

# केळी पिकात आंतरपीक म्हणून तिळाची लागवड करा, लाखोंचं उत्पन्न मिळवा!

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ द्वारा प्रसारित उन्हाळी हंगामासाठी असलेल्या फुले पूर्णा नावाच्या तीळ जातीचं बियाणे १००० एकर पेक्षा जास्त क्षेत्रावर बहारदारपणे फुललेलं आहे. काही शेतकरी बांधवांनी केळी पिकात आंतरपीक म्हणून तीळ पिकाची लागवड केली, तर काही शेतकरी बांधवांनी कापून गेलेल्या केळी पिकाच्या खोडव्यामध्ये तीळ पिकाची लागवड केली. तर काहींनी ठिंबकवर सलग तीळ पिकाची लागवड केली.

धुळे जिल्ह्यातील पिंपरी येथील शेतकरी राजेंद्र देवसिंग राजपूत यांनी तीन एकर क्षेत्रावर केळीची लागवड केली असून यात तीळ पिकाची लागवड केली आहे. यात केळीचे लागवड दिनांक ५ फेब्रुवारी रोजी तर तीळ पिकाची लागवड १९ फेब्रुवारी रोजी केली. या शेतकऱ्याने आतापर्यंत कसे नियोजन केले आहे? केळी पिकाला कसा फायदा होतो आहे, समजून घेऊयात....

**तिळावर बीजप्रक्रिया**

तीळ बियाणे लागवड करताना त्यांनी बियाणास बीज प्रक्रिया केली की, ज्यामुळे बियाणापासून व जमिनीमधून उद्भवणारे बुरशीजन्य रोग होऊ नये म्हणून बियाण्यास चार ग्रॅम ट्रायकोडर्मा पावडर प्रति किलो बियाणास चोळून लावले. त्यानंतर पेरणीपूर्वी पीएसबी र्लीश्रींीश २५ ग्रॅम प्रति किलो बियाणास बीज प्रक्रिया केली. पेरणी बैलपांबरीने ४५ ु १० सेंटीमीटर अंतरावर पाणी दिलेल्या क्षेत्रात वापसा आल्यावर केली.

**पेरणी प्रक्रिया कशी केली?**

पेरणी करताना बियाणे अडीच ते तीन सेंटीमीटर पेक्षा जास्त खोलीवर पडणार नाही, याची काळजी घेतली. बियाणे जास्त खोलवर पडल्यास उगवणीवर विपरीत परिणाम होईल, याची त्यांना पूर्वकल्पना होती. बियाणे तिफनने पेरताना एक किलो बियाणामध्ये मध्ये एक किलो दाणेदार खत आणि शेणखत मिश्रण करून वापरले.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

त्यामुळे विशिष्ट पाहिजे असलेल्या अंतरावर पेरणी करता आली. पेरणीनंतर आठ ते दहा दिवसांनी पहिली विरळणी आणि १५ ते २० दिवसांनी दुसरी विरळणी करावी लागली. पिकाच्या योग्य वाढीसाठी व अधिक उत्पादन मिळवण्यासाठी हेक्टरी रोपांची संख्या २.२० लाख प्रति हेक्टर इतकी राहील, याची काळजी घेतली.

**खत व्यवस्थापन करताना...**

खत व्यवस्थापन करताना तीळ पिकास चांगले कुजलेले शेणखत



पाच टन प्रति हेक्टर त्यासोबत एरंडी पेंड एक टन आणि दहा किलो सल्फर प्रति हेक्टर कुळवणी अगोदर जमिनीत चांगले मिसळून दिलेले होते. रसायनिक खत देताना तीळ पिकास नत्र ६० किलो प्रति हेक्टर स्फुरद ४० किलो प्रती हेक्टर आणि पोटॅश २० किलो प्रति हेक्टर याप्रमाणे पेरणी करताना दिले. नत्राची अर्धी मात्रा म्हणजेच ३० किलो देण्यासाठी ६३ किलो युरिया पेरणी करताना दिले तर उर्वरित मात्रा पेरणीनंतर २१ दिवसांनी दिले. नत्राची दुसरी मात्रा दिल्यानंतर पीकास पाणी दिले. अधिक उत्पादननासाठी पीक फुलोऱ्यात अवस्थेत असताना दोन टक्के युरियाची फवारणी केलेली आहे.

**तण नियंत्रणासाठी....**

साधारणपणे सुरुवातीचा ३५ ते ४० दिवसाचा कालावधी हा स्पर्धाक्षम असल्याने सुरुवातीच्या काळात तण नियंत्रण होणे आवश्यक होते. त्यासाठी पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी पहिली कोळपणी व निंदणी, नंतर ३० ते ३५ दिवसांनी दुसरी कोळपणी व गरजेनुसार निंदनी करून पीक तण विरहित ठेवलेले आहे. तीळ पिकाची मुळे ही तंतूमुळे असल्याने जमिनीच्या वरच्या थरात वाढत असल्याने खोल अंतर मशागत केल्यास मुळांना इजा पोहोचते. यांची पूर्वकल्पना असल्याने त्यांनी खोलवरची मशागत टाळली. पीक लहान असताना अंतर मशागत करावी लागली.

**पाणी व्यवस्थापन करताना..**

पाणी व्यवस्थापन करताना अत्यंत काळजी घेतलेली आहे. कारण तीळ पाण्यासाठी फारच संवेदनशीआहे. तिळाचे पीक हे पाण्याचा ताण सहन करणारे असले तरी उन्हाळी हंगामात पिकास पाण्याचा ताण पडू दिले नाही. साधारणतः जमिनीच्या मगदूराप्रमाणे बारा ते पंधरा दिवसाच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या दिलेले आहेत. पिकास फुले येण्याच्या तसेच बोंडे धरण्याच्या वेळेस पाण्याचा ताण पडू नये, म्हणून विशेष काळजी घेण्यात येत आहे. तीळ पिकास उन्हाळी हंगामामध्ये पाच ते सहा पाण्याच्या पाळ्या द्याव्या लागणार आहे.

पिक संरक्षणाच्या बाबतीत...

तीळ पिकावर प्रामुख्याने पाने गुंडाळणारी अळी, पाने खाणारी अळी व गादमाशी तसेच रस शोषण किडी, तुडतुडे कोळी व पांढरी माशी याचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून ह्या किडींच्या बंदोबस्तासाठी पहिली फवारणी ५% निंबोळी अर्काची आणि नंतर पंधरा दिवसाच्या अंतरानेकीटकनाशक दोन मिलि प्रति लिटर पाणी याप्रमाणे पंधरा दिवसाच्या अंतराने फवारणी केलेली आहे.उन्हाळी हंगामात तीळीवर प्रामुख्याने पर्णगुच्छ, मर, खोड व मुळकुज, भुरी हे प्रमुख रोग आढळून येतात. म्हणून त्यासाठी रोगाच्या नियंत्रणासाठी पेरणीपूर्वी बियाणास बीज प्रक्रिया केलेली आहे. अजून तरी प्लॉटमध्ये रोगाचा प्रादुर्भाव दिसून आलेला नाही, परंतु केळी पिकावर कॉपर ऑफ क्लोराईड १५०० ग्रॅम प्रति पाचशे लिटर पाण्यात मिसळून फवारणी केलेली आहे. त्यासोबत तीळ पिकावरही फवारणी घेतलेली आहे.गेल्या पाच, सात वर्षांपासून फेब्रुवारीत लागवड केलेल्या केळीला बाजारपेठेत चांगला भाव मिळत आहे. परंतु एक नावाचा विषाणूजन्य रोग हा नेमका उन्हाळी लागवडीमध्ये जास्त प्रमाणावर होतो. हा रोग होण्यास कारणीभूत असलेले विषाणू हे जवळ जवळ दोन हजार प्रकारच्या वर उपजत असतात. त्यांना पोषक हवामान ज्यावेळेस मिळते.




## शेवग्याच्या शेंगांचं सूप प्यायल्यानं शरीराला काय फायदे मिळतात? वाचाल तर रोज प्याल...

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**

शेवग्याच्या शेंगांची भाजी भरपूर लोक खूप आवडीनं खातात. शेवग्याचं झाड एक सुपरफूड मानलं जातं. कारण यात अनेक औषधी गुण असतात. शेवग्याच्या शेंगाच नाही तर पानं, फुलं देखील आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरतात. शेवग्याच्या शेंगाची, पानांची किंवा फुलांची भाजी तुम्ही अनेकदा खाल्ली असेल, पण शेवग्याच्या शेंगांचं सूप कधी प्यायलात का? जर तुम्ही कधी प्यायले नसाल आणि त्याचे फायदे माहीत नसतील तर आज आम्ही तुम्हाला तेच सांगणार आहोत. डायटिशिअन श्वेता पांचाल यांनी शेवग्याच्या शेंगांचं सूप कसं बनवायचं याचा एक व्हिडीओ इन्स्टावर शेअर केला आहे.

शेवग्याच्या शेंगांचं सूप शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यासाठी आणि आतड्या साफ करण्यासाठी ओळखल्या जातात. याने लिव्हर, किडन्या आतून स्वच्छ होतील. त्यासाठी शेवग्याच्या शेंगांच सूप तुम्ही नेहमी प्यायला हवं.

- शेवग्याच्या शेंगांमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर असतं. ज्यामुळे शरीराचा इन्फेक्शनपासून आणि वेगवेगळ्या आजारांपासून बचाव होतो. तसेच याच्या मदतीनं शरीरात पांढऱ्या रक्तपेशीही वाढतात. ज्यामुळे सर्दी, खोकला, ताप अशा समस्याही होत नाहीत.

- नियमित शेवग्याच्या शेंगाचं सूप प्यायल्याने शरीराला अनेक पोषक तत्व मिळतात. शरीरात पोषक तत्व कमी झाल्यावर या सूपने ती कमी भरून निघते. यातील बीटा




कॅरोटीन आणि व्हिटॅमिन सी मुळे इम्यूनिटी बूस्ट होते. ज्यामुळे तुम्ही नेहमी आजारी पडणार नाही.

यात अँटी-इन्फ्लेमटरी गुण असतात ज्यामुळे शरीरातील सूज कमी होण्यास मदत मिळते. तसेच याने सांधेदुखी आणि ऑस्टियोपोरोसिस सारख्या समस्याही दूर करण्यास मदत मिळते. यातील कॅल्शिअममुळे हाडे मजबूत होतात.


- शेवग्याच्या शेंगांमुळे पचनक्रिया चांगली होते. ज्यामुळे वजन कमी करण्यात मदत मिळते. उपाशीपोटी शेवग्याच्या शेंगांचं सूप प्यायल्याने पोटाचं आरोग्य चांगलं राहतं.

# तिवसा तालुक्यातील फत्तेपूर, जावरा शिवारात बिबट्याची भीती

## गोठ्यातील दोन शेळ्या फस्त केल्याचा संशय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४तिवसा-** तिवसा तालुक्यातील फत्तेपूर जावरा येथे मंगळवार १ रोजी रात्रीच्या वेळी गावानजीक असलेल्या शेळ्यांच्या गोठ्यात बिबट्याने केलेल्या हल्ल्यात दोन शेळ्या ठार झाल्या असून यामध्ये शेतकऱ्यांचे जवळपास वीस हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. बिबट्याचा परिसरातील वावर असल्याचा संशय असून शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण आहे. मौजा फत्तेपूर येथे घरालगतच असलेल्या गोठ्यात बांधलेल्या दोन शेळ्यांवर रात्रीच्या सुमारास बिबट्याने हल्ला करून शेळ्या फस्त केल्याची घटना बुधवार २ रोजी सकाळी ७ वाजताच्या दरम्यान उघडकीस आली आहे. फत्तेपूर येथील नितेश देवीदास कठाणे, असे पीडित पशू पालकांचे नाव आहे. पीडीत पशू पालक हा शेतकरी असून शेतीला जोड व्यवसाय म्हणून गत काही वर्षांपासून पशू पालनाचा व्यवसाय करीत आहे. संबंधित पशू पालकाकडे जवळपास गावातच ५० ते ६० शेळ्या असून, दिवसा शेळ्यांना चराईसाठी नेऊन संध्याकाळच्या सुमारास घरालगत असलेल्या गोठयात बांधले जाते. नेहमीप्रमाणे पशू पालकाने चराईसाठी नेलेल्या शेळ्या रात्रीच्या दरम्यान घरालगतच असलेल्या गोटयात बांधून ठेवल्या होत्या. मात्र, रात्री अचानक बिबट्याने केलेल्या हल्ल्यात दोन शेळ्या मृत्यूमुखी पडल्या. घटनेची माहिती वन विभागाला मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल, यांनी घटनास्थळी भेट देत घटनेचा पंचनामा केला असून यासंदर्भात आधीक तपास तिवसा वन विभाग करीत आहे. परिसरातील शेतकरी बांधवांनी काळजी घेण्याचे आवाहन वनविभागाने केले आहे.



### बिबट्याने शेळ्या मारल्याचा शेतकऱ्यांना आला संशय

घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी भेट देत पंचनामा केला आहे. परंतु, घटनास्थळी बिबट्याच्या पायाचे ठसे किंवा पाऊलखुणा आढळून आल्या नाहींत, यासंदर्भात अधिक तपास सुरू आहे. सध्या केवळ संशय व्यक्त होत आहे. -व्ही.जी.शेवतकर, वनरक्षक

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ४ एप्रिल २०२५

शहर/ग्रामिण


# अखेर 'तो' निर्णय रद्द.....

## मोफत गणवेश योजनेची अंमलबजावणी शाळा स्तरावर नाही

### शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापनाने सोडला सुटकेचा निश्वास

#### शिक्षक समितीच्या मागणीला यश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती** – राज्य शासनाने घेतलेला निर्णय राज्यातील मोठ्या वर्गास दिलासा देणारा आहे. अर्थात नेहमी किवा जवळपास रोजच काही तरी निर्देश देणाऱ्या शिक्षण खात्याबाबत हे घडले आहे.



आजचा निर्णय शिक्षकांच्या भूमिकेस योग्य ठरवितो, अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. २०२५–२६ या वर्षांपासून मोफत गणवेश योजनेची अंमलबजावणी शाळा व्यवस्थापन समिती करणार, असा निर्णय सत्तेवर येताच नव्या सरकारने २० डिसेंबर २०२४ रोजी घेतला होता. त्याचा निर्णय आज जारी करण्यात आला आहे.

मागील वर्षी असंख्य विद्यार्थ्यांना वेळेवर गणवेशमिळूशकला नव्हता. शिक्षकवपालक संघटनांनी त्यावर टीकेचे आसूड ओढले होते. आधी शासनाकडून कापड खरेदी करायची व त्याचे वितरण शाळांना करायचे आणि शाळा व्यवस्थापनाने स्थानिक पातळीवार शिवून घ्यायचे असे ठरले होते. आता तसे होणार नाही.

#### शाळा व्यवस्थापन समिती निर्णयक ठरणार

गणवेशकापडहेचांगल्यादर्जाचे, त्वचेला इजा न करणारे असावे. कापड १०० टक्के पॉलिस्टर नसावे. शिक्षणाधिकारी यांनी त्याची तपासणी करावी. निकृष्ट कापड दिसल्यास शाळा समितीस जबाबदार धरल्या जाणार. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेस याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या निर्णयामुळे शाळा व्यवस्थापन समिती आता निर्णयक ठरणार आहे. केंद्र शासनाने निश्चित केलेली गणवेश रक्कम व राज्य शासनाच्या मोफत गणवेश योजनेची रक्कम ही शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यावरच जमा होणार आहे. वर्ग पहिला ते वर्ग आठवा यातील मुलामुलींसाठी ही योजना राबवण्यात येते. शासनाने केलेला बदलहाशिक्षकतसेचशाळा व्यवस्थापन समिती संघटनानी स्वागतार्ह ठरवला आहे.

#### शिक्षक समितीचे म्हणणे काय ?

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती या संघटनेचे राज्याध्यक्ष विजय कोंबे म्हणतात की, 'एक राज्य, एक गणवेश' शासन निर्णय रद्द करून शाळा व्यवस्थापन समितीला गणवेशाचा रंग ठरवण्यासह खरेदी प्रक्रिया राबवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या शासन निर्णयाचे स्वागत असून जुनी पद्धती कायम ठेवल्याबद्दल शालेय शिक्षण विभागाचे आभार.

#### नवे निर्देश काय ?

आज प्रसिद्ध झालेल्या शालेय शिक्षण मंत्रालयाच्या निर्देशांनुसार, केंद्र शासनाच्या समग्र शिक्षावराज्य शासनाच्या मोफत गणवेश योजनेची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीवर राहणार. त्याची रक्कम समितीच्या बँक खात्यात जमा होणार. गणवेशरंगवरचना समिती निश्चित करणार. दोन पैकी एक गणवेश स्काउट गाईड संस्थेने निश्चित केलेल्या रंग संगतीप्रमाणे खरेदी करण्याचे अधिकार आजच्या निर्णयाने शाळा समितीस प्राप्त झाले आहे.

## महादेवखोरी येथील ऋषिकेश ठाकरे हत्याप्रकरण

## ब्रिजेश उर्फ विजय मुलचंद गुप्ता याला जन्मठेपेची शिक्षा

### प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व दोन पंच फितूर घोषित



**विदर्भ प्रजासत्ताक, दि.४अमरावती** – स्थानिक महादेवखोरी भागात हनुमान मंदिराजवळ दहा वर्षांपूर्वी घडलेल्या ऋषिकेश ठाकरे हत्याप्रकरणात प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. व्ही. यार्लगड्डा यांच्या न्यायालयाने आरोपी ब्रिजेश ऊर्फ विजय मुलचंद गुप्ता (वय ३७) याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली तर महिला आरोपीची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली.न्यायालयात ७ मे २०१४ ला दाखल दोषारोपपत्रानुसार, ही घटना ८ फेब्रुवारी २०१४ ला घडली होती. गौरव अशोकराव इंगोले याच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी ब्रिजेश उर्फ विजय मुलचंद गुप्ता (सध्या वय ३७ वर्षे, रा. हनुमान मंदीराजवळ महादेवखोरी) याच्याविरुद्ध भादंविचे कलम ३०२, ३०७, ३२६, ५०४, २९२, २०१, २९४, आणि ३४ भा.द.वी. सह कलम १३५ महाराष्ट्र पोलिस अधिनियमान्वये गुन्हा नोंदविला होता. ऋषिकेश ठाकरे व गौरव इंगोले (दोघेही रा. महादेव खोरी) या दोन मित्रांचा ब्रिजेश गुप्ता याच्यासोबत वाद होता. ८/२/२०१४ रोजी सकाळी १०:३० वाजता ऋषिकेश ठाकरे व गौरवइंगोले हे हातात सायकल घेऊन पायी महादेवखोरी येथून त्यांच्या घरी जात होते. त्यावेळी ब्रिजेश गुप्ता व त्याचा अल्पवयीन भाचा हे त्याच्या घरासमोर उभे होते. त्यांनी ऋषिकेश व गौरव यांना मारहाण केली. लगेचच ब्रिजेश याने घरातून तलवार आणून गौरव इंगोले वर हल्ला केला. तो चक्कर येवून तिथे पडला. लगेचच ब्रिजेशने त्याच्या हातातील तलवारीने ऋषिकेशच्या मागे जाऊन त्याच्या छातीत तलवार मारून त्याचा खून केला. भांडण होत असतांना गोपाळ छापेकर यांनी भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला व ऋषिकेश याला त्याने प्रथम मोटार सायकलने व बेनोडा चौकातून ऑटोरिक्षामध्ये टाकून जिल्हा सामान्य रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी ऋषिकेशला मयत घोषित केले.गौरव इंगोलेच्या बयानावरून पोलिसांनी गुन्हा नोंदविला. घटनास्थळ पंचनामा वरीष्ठ पोलिस निरीक्षक मनिष ठाकरे यांनी केला होता.सहायक पोलीस निरीक्षक एन. डी. ओतारी यांनी तपासाअंती दोषारोपपत्र दाखल केले. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. व्ही. यार्लगड्डा यांच्या न्यायालयात खटल्याची सुनावणी झाली. सरकारी पक्षातर्फे ॲड. सुनील देशमुख यांनी ११ साक्षीदारांची साक्ष नोंदविली. त्यापैकी प्रत्यक्ष साक्षीदार गोपाळ छापेकर आणि पंच वेतन खानझोडे, योगेश खानझोडे यांना फितूर घोषीत करण्यात आले.

दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकून विद्यमान न्यायालय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. व्ही. यार्लगड्डा यांच्या न्यायालयाने आरोपी ब्रिजेश उर्फ विजय मूलचंद गुप्ता याला खुनाच्या गुन्ह्यात जन्मठेप, खुनाचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली पाच वर्ष सक्त मजुरीची शिक्षा व कलम कलम ५०४ अंतर्गत तीन महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा तसेच मुंबई पोलिस कायदा १३५ खाली चार महिण्याची साधी शिक्षा ठोठावण्यात आली. ह्या सर्व शिक्षा एकत्र भोगण्यात येईल. त्याचप्रमाणे त्याला वीस हजार रूपयाचा दंड ठोठावण्यात आला. त्यापैकी दहा हजार रुपये जखमी गौरव इंगोले यास तर उर्वरित दहा हजार रूपये मृत ऋषिकेशच्या वारसांना देण्याचे आदेश न्यायालयाने पारीत केले. प्रकरणामध्ये सरकारच्या वतीने सहायक सरकारी वकील तथा अतिरिक्त शासकीय अभियोक्ता ॲड. सुनिल देशमुख यांनी बाजू मांडली.

## मा.खा.नवनित रवि राणा यांना लिपिक टंकलेखक संघटनेच्या वतीने निवेदन

### तात्पुरती निवड यादी व अंतिम निवड यादी प्रक्रिया जलद गतीने राबविण्याची केली मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती** – ३अमरावती जिल्ह्यातील तसेच संपुर्ण महाराष्ट्रातील नोकरी संदर्भात बेरोजगारांना न्याय मिळवून देण्याचा खासदार असतांना सुद्धा नवनित रवि राणा यांनी प्रयत्न केला तसेच आता सुद्धा शेकडो बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्याच्या उद्देशाने मा.खा.नवनित राणा या प्रयत्नरत आहेत. त्या अनुषंगाने गेल्या २०२३ साली शासनाच्या वतीने लिपिक टंकलेखक या पदाची परिक्षा घेण्यात आली होती. त्यामध्ये निवड झालेल्यांची तात्पुरती निवड यादी व अंतिम निवड यादी प्रक्रिया थंड बस्त्यात असुन हि प्रक्रिया जलद गतीने राबविण्यासंदर्भात नुकतेच लिपिक टंकलेखक संघटनेच्या वतीने जा.के.१११/ २०२३ तात्पुरती निवड यादी व अंतिम निवड यादी प्रक्रिया राबविण्यासंदर्भात निवेदन देण्यात आले.



यावेळी मा.खा.नवनित राणा यांनी सांगितले की, प्रत्येकाला रोजगार मिळवून देणे हेच माझे ध्येय असुन मी लवकरात लवकर शासन स्तरावर या विषयाचा पाठपुरावा करुन लिपिक टंकलेखक लाभार्थ्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करण्याचे यावेळी आश्वासन दिले. यावेळी अनिकेत भगत, रोहित वाढ, निलेश मावळे, अनिकेत मुळे, संदिप रायबोले, मनिषा पवार, सरस्वती गायकवाड, करिश्मा मेश्राम, निकिता कोहळे, पायल खोब्रागडे, आचल बोबडे, प्रतिक्षा बिजवे, प्रियंका जोगी, प्रतिक्षा मानापुरे, स्वाती वानखडे, पोर्णिमा पांडे, वैभव खैरकर, रोहिणी वानखडे, तेजस वानखडे, पवन वानखडे, रवि येवले, प्रतिक बसावनाथे, सौरभ बागडे, निलेश कुऱ्हाडे, संकेत फसाते, अक्षय वानखडे, आकांक्षा सुर्यजोशी, प्रज्वल टिक्कस, अक्षय मानापुरे, सागर खोब्रागडे, श्याम कोरांगे, हरिश भोयर, किर्ती महल्ले सह शेकडो लिपिक टंकलेखक संघटनेचे सदस्य व परिक्षार्थी उपस्थित होते

## उद्याला विद्याभारती महाविद्यालयात पदवी वितरण, सन्मान सोहळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती** – स्थानिक विद्याभारती महाविद्यालययेथे शनिवारी (ता. पाच) सकाळी १० वाजता पदवी वितरण व सन्मान सोहळ्याचे आयोजन केले आहे. पहिल्या सत्रात पदवी वितरण, दुसऱ्या सत्रात ज्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आंतरराष्ट्रीय– राष्ट्रीयस्तरावर उपलब्धी प्राप्त केलेली आहे तसेच नामांकित जर्नलमधून त्यांचे शोधनिबंध प्रकाशित झालेले आहेत, त्यांचा जेम्सतर्फे सन्मान करण्यात येणार आहे.तिसऱ्या सत्रामध्ये विद्याभारती कॅम्पसमधील विद्याभारती कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, विद्याभारती औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, श्रीमती प्रतिभाताई पाटील शिक्षण शास्त्र महाविद्यालय व विद्याभारतीआय टी आय या सर्व महाविद्यालयातील सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रामध्ये प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेच्या सदस्य तथा गणित अभ्यास मंडळाच्या अध्यक्ष डॉ. विद्या शर्मा, जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. गणेश जाधव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील शारीरिक शिक्षण विभागाच्या संचालक डॉ तनुजा राऊत व विद्याभारती शैक्षणिक मंडळाचे सचिव डॉ. अशोक चौहान,



प्राचार्य डॉ. प्रज्ञा येनकर, प्राचार्य डॉ. एस डी पांडे, प्राचार्य डॉ. के. बी. शिरभाते, प्राचार्य जी. बी. तवर, जेम्स समन्वयक प्रा. एच. के. सिसोदिया उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी विद्याभारती शैक्षणिक संस्थेच्या उपाध्यक्षा डॉ. मिथिलेश राठौर राहतील. या कार्यक्रमात कला, विज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन अशा विविध शाखेतील विद्यार्थ्यांना पदवी वितरीत करण्यात येईल. विविध शाखेतील मेरीट विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात येईलतसेच या सोहळ्यात शिक्षक व प्रावीण्यप्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येईल तरी या सोहळ्याला जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन समन्वयक डॉ. एम.यु.घुरडे, डॉ योगेश आखरे यांनी केले आहे.

## जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांना पदोन्नती

**विदर्भ प्रजासत्ताकदि.४अमरावती** अमरावती जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांसाठी आजचा दिवस महत्त्वपूर्ण ठरला आहे. जिल्हा परिषद सेवेतील प्राथमिक शिक्षकांना मिळणाऱ्या सर्व प्रकारच्या पदोन्नत्या आज एकाच दिवशी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी केल्या.

या पदोन्नत्यांसाठी अमरावती जिल्हा प्राथमिक शिक्षक संघ मागील एक वर्षापासून सातत्याने प्रशासनासोबत पाठपुरावा करत आलेला आहे.त्यामुळे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी एक महिन्याआधी अ. महा. प्राथ. शिक्षक संघाला निमंत्रित करून सर्व प्रकारच्या पदोन्नत्या करण्यात येतील, असे आश्वासित केले होते.त्याप्रमाणे विस्तार अधिकारी वर्ग ३ श्रेणी दोन ६ पदे, विस्तार अधिकारी वर्ग ३ श्रेणी ३ ची ४ पदे, केंद्रप्रमुख २३ पदे, उच्च श्रेणी मुख्याध्यापक मराठी १२० पदे, उर्दू २०, तसेच माध्यमिक शिक्षक उच्च श्रेणी या सर्व पदोन्नत्या आज करण्यात आल्यात.त्याबद्दल अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघातर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र,




शिक्षणाधिकारी प्राथमिक अरविंद मोहरे, उपशिक्षणाधिकारी बुद्धभूषण सोनवणे, विस्तार अधिकारी श्री मोहने या सर्व पदोन्नतीसाठी राबणारी शिक्षण विभागाची चमू विशेषतः श्री. मालोकर, काळमेघ, ऋषिकेश कोकाटे, बिलबिले, अधीक्षक प्रवीण जिसकार व प्रशासन अधिकारी मुद्रे या सर्वांचे किरण पाटील, गजानन चौधरी, सुभाष सहारे, संजय साखरे, अशोक चव्हाण यांनी अभिनंदन केले आहे.

### महावितरण चा मनमानी कारभार....

## रायपूर जहागीर शेत शिवारातील पाच एकर शेतातील बांबू जळून खाक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४भातकुली–** असदपूर अंतर्गत येणाऱ्या मौजे रायपूरच्या शेत शिवारात असलेल्या हे सर्वे नंबर ३४ पाच एकर शेतात असलेल्या बांबू स्प्रिंकर पाईप इतर शेती साहित्य शॉक सर्किट मुळे जळून खाक झाला आहे.

शेतकरी संजय तापडिया यांनी २०२१ मध्ये बांबू शेतीची लागवड केली होती , महावितरण कार्यालयाकडे अनेक वेळा तक्रारी देऊन सुद्धा त्याकडे लक्ष दिले नाही महावितरणच्या मनमानी कारभारामुळे शेतकरी त्रस्त झाले होते अश्यातच शॉर्ट सर्किट मुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पाच एकर शेतामध्ये लागवड केलेला बांबू जळून खाक झाल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तवल्या जात आहे सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून




आम्हाला न्याय आणि नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी संजय तापडिया या शेतकऱ्यांनी केली आहे.–

## पिंपल्या गावात पाणी पुरवठा बंद जलजीवन मिशनला मेळघाटात सुरूंग

### पाणी पुरवठ्याचे विद्युत साहित्य बेपत्ता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४चिखलदरा** – चिखलदरा तालुक्यातील राहु ग्राम पंचायत अंतर्गत असलेल्या पिंपल्या गावात मागील एका वर्षापासून बंद पडलेली पाणी पुरवठा योजनेचे अनेक साहित्य बेपत्ता झाल्याने भिषण पाणी टंचाईचा सामना आदिवासींना करावा लागतआहे. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना ग्रामस्थांनी तक्रार दिलेली आहे. जलजीवन मिशन अंतर्गत झालेल्या या पाणी पुरवठा योजनेतील नळ सध्या तहाणलेले असून गावातील हॅण्ड पंपावर पाण्यासाठी महिलांचे भांडण होत आहे. धारणी पासून ८० कि.मी अंतरावरावरील पिपल्या गाव सध्या पाण्याचया भिषण टंचाईसाठी अमरावती जिल्ह्यात ओळखल्या जात आहे. गत वर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील ग्रामीण भारतासाठी जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजना साकारण्यात आलेली होती. घराघरात नळ लावण्यात आले. गावगावातील घरासमोर लागलेले नळ फक्त शोभेची वस्तु झालेली आहे. नळांची आता तुटफोट होत आहे. तर दुसरीकडे पाणी पुरवठा योजनेचे स्टार्टर खराब झाल्यावर कोणीतरी ते काढून नेलेले असल्याने आता योजना शंभर टक्के बंद पडलेली आहे.माहितीनुसार, गावात फक्त एकच हॅण्डपंप असल्याने पूर्ण गाव पाण्यासाठी त्या पंपावर जमा होत असल्याने भांडणे सुरू होऊन गावातील शांतता भंग होण्याची भिती व्यक्त होत



आहे. विहिरीत भरपुर पाणी असल्यावरही बांधकामाची गुणवत्ता आणि विद्युत उपकरणांचानिकृष्टपणा असल्याने लोकपाणी टंचाईचा सामना करण्यासाठी विवश आहेत. स्थानिक ग्राम पंचायत व सरपंचाने गावातील पाणी टंचाईकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी आहे. मे महिन्यातर पाणी टंचाई तीव्र होऊन नागरिक गाव सोडून जाण्याच्या तयारीत लागतील, असा धोका होऊ शकतो.

## रेल्वे मालवाहतुकीतील कार्यक्षमतेत वाढ

### तीन हजार मैट्रिक टन योजनेत उत्तम कामगिरी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.४अमरावती,** भारतीय रेल्वेच्या मालवाहतुकीतील सक्षमीकरणा –साठी हाती घेतलेल्या मिशन तीन हजार मेट्रिक टन योजनेंतर्गत भुसावळ विभागाची कामगिरी उत्तम ठरली. यांत्रिक विभागात मालगाडी परीक्षण यार्ड आणि 'आर ओएच डेपो'मध्ये मालवाहतूक वॅगनची देखभाल व परीक्षण वेगाने पूर्ण केल्यानेमालगाड्यांची कार्यक्षमता आणि विश्वासार्हता वाढली आहे.



भुसावळ कॅरेज आणि वॅगन विभागाने मालगाड्यांच्या देखभालीत ऐतिहासिक टप्पा त गाठला. मार्च २०२५ मध्ये सर्वाधिक एकूण ७०२ वॅगनचे आर ओएचच यशस्वीपणे पूर्ण केले ही संख्या फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या ५२१वॅगनच्या तुलनेत ३४.७ टक्के अधिक असून, मार्च २०२४ मध्ये झालेल्या ४४१ वॅगनच्या तुलनेत ५९.१ टक्के वाढ झाली.भुसावळ विभागातील 'कंटिन्युअस चेक' (सी.सी.) मालगाडी रेक संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. मार्च २०२४ मध्ये १३३ असलेली सी.सी. मालगाडी रेक संख्या मार्च २०२५ मध्ये २३८ वर पोहोचली. त्यात ७८.९४ टक्के वाढ दर्शवते. त्यामुळे मालगाड्या मालवाहतुकीसाठी उपलब्ध होऊन रेल्वेच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली. वर्ष २०२४–२५ मध्ये एकूण १६८९ सी.सी. मालगाडी रेक परीक्षण पूर्ण केले. याच्या तुलनेत २०२३–२४ मध्ये १२७१ सी.सी. रेक परीक्षण झाले. ही वाढ ३२.८८ टक्के अधिक आहे.

# आमदार, खासदारांना पेन्शन तर शिक्षकांना का नाही..?

## शिक्षकांच्या प्रलंबित समस्यांवर बच्चू कडूंची आक्रमक भूमिका






### प्रहार शिक्षक संघटनेच्या विभाग स्तरीय शिक्षक समस्या निवारण सभेत शेकडो शिक्षकांची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ अचलपूर –** आमदार ,खासदारांना पेन्शन असू शकते तर आपली हयात शासनाच्या कामाकरिता घालवणारे शिक्षकांना जुनी पेन्शन का नको..? असा परखड सवाल राज्यकर्त्यांना करत माजी राज्यमंत्री बच्चू कडू आणि शिक्षकांच्या प्रलंबित समस्यांवर प्रथमच आपली आक्रमक भूमिका व्यक्त केली.प्रहार शिक्षक संघटनेच्या अमरावती विभाग स्तरीय शिक्षक समस्या निवारण सभेचे आयोजन प्रहार शिक्षक संघटनेच्या वतीने पुरण पूर्ण येथे करण्यात आले होते. या सभेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी राज्यमंत्री तथा प्रहार शिक्षक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू उपस्थित होते. या सभेला अमरावती विभागातील अमरावती अकोला, वाशिम, बुलढाणा ,यवतमाळ व इतर जिल्ह्यातूनही शेकडो शिक्षकांनी उपस्थिती लावली होती. या सभेत शिक्षकांनी अक्षरशः आपल्या समस्यांचा पाऊस पाडला.जिल्हा परिषद, खाजगी अनुदानित विनाअनुदानित, महानगरपालिका नगरपालिका व आश्रम शाळा या विभागात कार्यरत शिक्षक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.अनेक शिक्षकांनी आपल्या समस्या चा पाढा बच्चू कडू पुढे मांडला.यावेळी सभेचे प्रास्ताविक या सभेचे निमंत्रक व प्रहार शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी केले.आपल्या प्रास्ताविका तून त्यांनी प्रहार शिक्षक संघटनेची २०१६ पासून ची वाटचाल विशद करीत सध्या परिस्थितीत शिक्षकांच्या ज्वलंत प्रश्नांचा समस्यांचा पाढा वाचला.तसेच त्यांनी संघटनेचा गेल्या नऊ वर्षाचा कार्य अहवाल संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू यांना सादर केला.यावेळी मंचावर प्राचार्य डॉक्टर दीपक धोटे ,प्रहार जनशक्ती पक्षाचे राज्य प्रवक्ते जितू दुधाने, कसबे गव्हाण चे सरपंच शशिकांत मंगळे, अचलपूर येथील सेवानिवृत्त शिक्षक श्री.हादी उपस्थित होते.याप्रसंगी समस्या निवारण सभेला संबोधित करताना बच्चू कडू यांनी राज्यकर्त्यांचा शिक्षकांच्या समस्यांवर चांगला खरपूस समाचार घेतला. शिक्षकांना जुनी पेन्शन मिळावी ,वैद्यकीय देयक तत्काळ देण्यात यावी, शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्या, अंतर्गत बदल्या यातील पारदर्शकता कायम राहावी, शिक्षकांकडे अवाजवी कामे काढून घेण्यात यावी ,शिक्षकांना मानसिक स्थैर्य मिळावं, आदिवासी भागात कार्यरत शिक्षकांना प्रोत्साहन भत्ता ,अतिरिक्त घरभाडे भत्ता मिळावा, वस्ती शाळा शिक्षकांचे प्रश्न खाजगी अनुदानित शाळांना अनुदान, आश्रमशाळा शिक्षका च्या समस्या, महानगर पालिके तील शिक्षकांच्या समस्या यावर आपली आक्रमक भूमिका व्यक्त करत येणाऱ्या काळात शिक्षकांच्या समस्या करिता शासन दरबारी मोठे आंदोलन उभे करत ,आवाज उठवू आणि बुलंद करू अशी भूमिका यावेळी मांडली. शिक्षकांना नाहक कुणी बदनाम करण्याचा प्रयत्न केल्यास त्यालाही परखडत प्रत्युत्तर देण्यात येणार असल्याचे सांगितले.विभागात सहा आमदार असताना सुद्धा शिक्षकांची समस्या सुटत नाही ही शोकांतिका असल्याची खंत देखील त्यांनी व्यक्त केली. लवकरच शिक्षकांच्या प्रलंबित समस्यांवर एक कृती कार्यक्रम ठरवून समस्यांचा निपटारा करणार असल्याचे ग्वाही या सभेच्या प्रसंगी त्यांनी दिली.यावेळी जितू दुधाने डॉक्टर दीपक धोटे यांनी सुद्धा सभेला संबोधित केले. सभेचे संचालन संघटनेचे अकोला जिल्हा कार्याध्यक्ष अमर भागवत व आभार प्रदर्शन विभागीय सचिव अमोल आगे यांनी केले. याप्रसंगी अमरावती भागातील संघटनेतील पाचही जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष सर्वश्री शरद काळे, मंगेश टिकार, महिंद्र रोठे, कुलदीप डंबारे,महादेव ठाकरे, अकोला प्रसिद्धी प्रमुख अमित फेंडर, नागेश जोगदे हेमंत बोरकर यांचा बच्चू कडू यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन उत्कृष्ट संघटनात्मक व शैक्षणिक कामाबद्दल सत्कार करण्यात आला. या सभेला संघटनेचे विभागातील सर्व पदाधिकारी ,सभासद आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### 'शिक्षकहृदय सम्राट' पुरस्कार प्रदान

समस्या निवारण सभेत प्रहार शिक्षक संघटनेच्या वतीने राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी संघटनेचे विभागातील जिल्हाध्यक्ष व सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये बच्चू कडू यांना शिक्षक हृदय सम्राट हा पुरस्कार प्रदान केला. या पुरस्काराचे स्वरूप सन्मान चिन्ह शाल व श्रीफळ असे होते. प्रथमच विभागातील कुठल्यातरी लोकप्रतिनिधीला शिक्षकाने कडून शिक्षक उदय सम्राट हा पुरस्कार प्रदान करण्यात आलेला असल्याची चर्चा यावेळी होती.

# २० वर्षीय चालकाने आजोबांना चिरडले

## गुरुकुंज मोझरीजवळ घडली दुर्दैवी घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ गुरुकुंज मोझरी –** गुरुदेव नगरच्या ७८ वर्षीय वृद्धाचा अपघातात मृत्यू:स्कॉर्पिओच्या धडकेत दुचाकीस्वार रामभाऊ साबळे यांचा घटनास्थळीच मृत्यू; २० वर्षीय चालक ताब्यात अमरावती–नागपूर राष्ट्रीय महामार्गावर गुरुवारी दुपारी एक धक्कादायक अपघात घडला. गुरुदेवनगर (गुरुकुंज) येथील ७८ वर्षीय रामभाऊ शेषराव साबळे यांचा या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला.घटना गुरुकुंज मोझरीजवळील आशीर्वाद बार परिसरात दुपारी दीड वाजताच्या सुमारास घडली. रामभाऊ साबळे आपल्या दुचाकीने (एम.एच.२७.ए.बी.८८२७) गुरुदेवनगर गुरुकुंजहून तिवसाकडे खाजगी कामानिमित्त जात होते. याच वेळी मागून येणाऱ्या भरधाव स्कॉर्पिओने (एम.एच.२७.डी.

एल.६२६२) त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. तिवसा पोलिसांनी



तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. अपघातातील दोषी वाहनचालक कलंदर उधीन (वय २० वर्षे) आणि त्याच्या साथीदारांना ताब्यात घेण्यात आले. चालकाविरुद्ध कलम २८१, १०६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून वाहनही जप्त करण्यात आले आहे. मृतक रामभाऊ साबळे यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अकाली निधनाने गुरुदेवनगर परिसरात शोककळा पसरली आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भगवा फडकवा

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिदे यांचे आवाहन

### यवतमाळात आभार यात्रेच्या निमित्ताने जाहीर सभा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४यवतमाळ–** राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. शिवसैनिकांनी गाफील न राहता यानिवडणुकीत राज्यात सर्वत्र शिवसेनेचा भगवा फडकवायचा आहे. त्यासाठी शिवसेना कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी शिवसेना पक्ष आणि शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार तळागाळात पोहचवावे आणि या निवडणुकीच्या यशासाठी आतापासूनच कामाला लागावे, असे आवाहन शिवसेना पक्ष मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिदे यांनी केले.

स्थानिक पोस्टल मैदान येथे आभार यात्रेच्या निमित्ताने आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. कार्यक्रमास उद्योग मंत्री उदय सामंत, यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड, शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख हरिहर लिगनवार, जिल्हाप्रमुख श्रीधर मोहोड, माजी आमदार विश्वास नांदेकर, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष कालिदा पवार, शीतल संजय राठोड, जीवन पाटील, पराग पिगळे,विशाल गणात्रा आदी उपस्थित होते.

एकनाथ शिदे म्हणाले, राज्यात सर्व सामान्य जनता, शेतकरी, महिला, तरुण हेच विकासाचे केंद्रबिंदू आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांनी महायुती सरकारची लोकाभिमुख आणि गतिमान वाटचाल सुरू आहे. विरोधकांनी कितीही प्रयत्न केले तरी, लाडकी बहीण आणि अन्य योजना भविष्यात कधीही बंद होणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिदे यांनी यावेळी दिली. आपल्या अडीच वर्षांच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात राज्यातील पाच कोटी लाभार्थ्यांना शासन आपल्या दारी उपक्रमातून विविध योजनांचा लाभ मिळाला. लाडक्या बहिणी लखपती दीदी व्हाव्यात यासाठी त्यांच्याकरीता रोजगार, उद्योगाच्या नवीन योजना लवकरच सुरू करण्याचे आश्वासन शिदे यांनीयावेळी दिले. विदर्भाच्या विकासासाठी महायुती सरकार कायम प्रवतशील आहे. येथील शेतकऱ्यांना सोयाबीन, कापसाचा हमीभाव देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यकर्ते, जनताहीच आपली ताकद, असल्याचे त्यांनी सांगितले. आता उपमुख्यमंत्री असलो तरी कामाचा झपाटा सुरू आहे, भविष्यातही सर्वसामान्य जनतेच्या विकासासाठीच कार्यरत राहील, असे शिदे म्हणाले. 'कोण गद्दार, कोण खुद्दार' याचा निर्णय जनतेने विधानसभा निवडणुकीत केला आहे. सध्या विरोधी पक्षाची अवस्या' नाशेंडाना बुड' अशी झाल्याची टीका त्यांनी केली. वक्फ बोर्डाच्या निर्णयाविरोधात मतदान करून कोण गद्दार आहे, याची प्रचिती 'त्या' शिवसेनेने दिली, असा टोलाही त्यांनी लगावला.

# 'सुप्रीम आदेशाने थांबली 'एमएमसी'ची निवडणूक

### १४९ डॉक्टरांचे मतदान तर ५० जण होते रांगेत



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती–** महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या (एमएमसी) निवडणुकीत स्थानिक १४९ डॉक्टरांचे मतदान झाल्यावर गुरुवारी दुपारी अचानक पुढची प्रक्रिया थांबवली. जिल्हा प्रशासनाने ऐनवेळी उचललेल्या या पावलामुळे जिल्ह्याच्या वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली होती. दरम्यान काही वेळाने सर्वोच्च न्यायालयाने स्थगनादेश जारी केल्याने प्रशासनाला हा निर्णय घ्यावा लागला, असा खुलासा केला.प्राप्त माहितीनुसार, या निवडणुकीचे राज्यव्यापी संचालन करण्यासाठी शासनातर्फे निवडले जाणारे निवडणूक निर्णय अधिकारी हे सचिव दर्जाचे असावे लागते. परंतु या वेळी निवडलेले अधिकारी हे ती पात्रता धारण करत नव्हते. त्यामुळे परिषदेच्या काही माजी पदाधिकाऱ्यांनी हा मुद्दा न्यायप्रविष्ट केला. पुढे सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुकीवर स्थगनादेश दिला. राज्यभरातून या निवडणुकीसाठी ९ प्रतिनिधी निवडले जाणार होते. त्यासाठी ४० उमेदवार मैदानात होते. महाराष्ट्र वैद्यकीय परिषद ही एकूण १७ सदस्यीय समिती आहे. यामध्ये ५ प्रतिनिधी हे शासन नियुक्त असतात. तर उर्वरित तिघे माजी पदाधिकाऱ्यांमधून निवडले जातात. दरम्यान उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी चारही मतदान केंद्रांवरील मतपेट्या सील करून त्या कोषागारात जमा केल्या आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी सुनीलकुमार धोंडे यांनीच तसे आदेश बजावले होते. तत्पूर्वी या निवडणुकीसाठी जिल्हा स्त्री रुग्णालय परिसरातील जीएमसी इमारतीत चार मतदान केंद्रे उघडली होती. या चारही केंद्रांवर २ हजार ३३९ डॉक्टर्स मतदान करणार होते. सकाळी ११ ते सायंकाळी ५ अशी मतदानाची वेळ होती. मात्र १४९ डॉक्टरांनी मतदान केल्यानंतर अचानकच एका विशेष दुताद्वारे मतदान केंद्रावर स्थगनादेशाची प्रत मिळाल्यावर पुढचे मतदान थांबवले. या वेळी ५० डॉक्टर्स मतदानाच्या रांगेत उभे होते. यापूर्वी या परिषदेवर शिवाजी शिक्षण संस्थेचे शिक्षण संचालक डॉ. पद्माकर सोमवंशी आणि इंडियन मेडिकल असोसिएशनचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. उद्धव देशमुख यांनी प्रतिनिधित्व केले आहे.

## बडनेरा ते कुरुम दरम्यान अप व डाउन लाईनवर स्वयंचलित सिग्नल प्रणालीसाठी विशेष ब्लॉक

### अमरावती ते वर्धा, वर्धा– अमरावती मेमू रद्द

**विदर्भ प्रजासत्ताकदि.४बडनेरा –**

भुसावळविभागामार्फत बडनेरा–शेगाव खंडातील बडनेरा ते कुरुम स्थानकांदरम्यान अप व डाउन लाईनवर स्वयंचलित सिग्नल प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी पूर्व–नॉन इंटरलॉकिंग व मॉन इंटरलॉकिंग विशेष ब्लॉक घेण्यात आला होता. त्यामुळे ३ एप्रिल गुरुवार रोजी नॉन–इंटरलॉकिंग ब्लॉक कार्यान्वित करण्यात आला. गाडीक्रमांक ६१११५ बडनेराते अमरावती मेमू, गाडी क्रमांक ६११०७ अमरावती तेवर्धामेमू, गाडीक्रमांक ६११०८ वर्धा ते अमरावती मेमू, गाडी क्रमांक ६१११६ अमरावती ते बडनेरा मेमू ३ एप्रिल रोजी रद्दकरण्यात आल्या होत्या.

गाडी क्रमांक, ६११०६ नरखेड, ते बडनेरा मेमू आपल्यानियोजित वेळेपेक्षा नरखेड ९० मिनिटे उशिय। सुटली. गाडीक्रमांक ६११०२ बडनेराते भुसावळमेमू नियोजित वेळेपेक्षा बडनेरा येथून ९० मिनिटे उशिरा सुटली, असे मध्य रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. रेल्वेच्या या ब्लॉकमुळे प्रवाशांची चांगलीच अडचणझाल्याचे चित्र होते.

# दर्यापूर तालुका कृषी मंडळे नुकसान भरपाईपासून अपात्र

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४दर्यापूर–** गतवर्षी दर्यापूर तालुक्यामध्ये ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली. यामध्ये अनेक शेतकऱ्यांचे अतोनात पिकांचे, जमिनीचे नुकसान झाले. यात मुख्यत्वे करून खल्लार कृषी मंडळातील नालवाडा परिसरात ढगफुटीसदृश पाऊस होऊन शेतकऱ्यांच्या जमिनी पूर्णपणे खरडून गेल्या होत्या. तसेच तालुक्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली होती.

कृषी विभागाच्या महावेध पर्जन्य मापन यंत्राच्या सहायाने घेण्यात आले. अशी माहिती समोर आली. मात्र तालुक्यातील ७० टक्क्यांच्या वर पर्जन्यमापन यंत्र खराब स्थितीत आहेत. त्यामुळे वंचित असलेल्या सर्व कृषी मृडळांना नुकसान भरपाईसाठी पात्र करण्यात यावे. अशी मागणी बुधवार (दि.२) रोजी सुनील डिके यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघर्ष कृती समितीद्वारे तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

शासनाने २०२४–२०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी नुकसान संदर्भात आदेश काढला. त्यामध्ये दर्यापूर तालुक्यातील ८ कृषीळापैकी ३ कृषी मंडळे दर्यापूर, सामदा, रामतीर्थ हे अतिवृष्टीच्या नुकसान भरपाई साठी पात्र केली. मात्र उर्वरित खल्लार, थिलोरी, वडणेर गंगाई, येवदा, दारापूर या मंडळाना नुकसान भरपाईतून वगळण्यात आले. शासनाने तालुक्यातील उर्वरित व सर्व दर्यापूर तालुका अतिवृष्टी नुकसान भरपाईसाठी पात्र करावा.

असे शेतकरी संघर्ष कृती समितीद्वारे दिलेल्या निवेदन नमूद आहे.यावेळी सुनील डिके, दिलीप राहाटे, विनोद सोनटक्के, विनोद वडतकर, सतीश काळे, सुनील भारसाकळे, पंकज रेखे, योगेश बुंदे, राहुल सांगोले, कुलदीप चौधरी, यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

# दापोरी येथील 'जलजीवन'च्या योजनेला वीजजोडणी मिळता मिळेना !

## ८ दिवसात वीज कनेक्शन न मिळाल्यास रुपेश वाळके यांचा आंदोलनाचा ईशारा !

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४मोर्शी–** मोर्शी तालुका आधीच ड्राय झोन मध्ये असल्यामुळे पाणी टंचाईची दहाकता लक्षात घेऊन जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजनांची कामे मार्गी लावण्याचे आदेश आहेत. या आदेशानुसार जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने दापोरी येथील नवीन पानी पुरवठा योजाना १ कोटी ८१ लक्ष रुपये खर्च करून पूर्ण केली. पाणी टंचाईची दहाकता लक्षात घेऊन जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजनांची कामे मार्गी लावण्याचे शासनाचे आदेश असतांना सुद्धा वीजबिल न भरल्यामुळे जलजीवन मिशनच्या पाणीपुरवठा योजनांचे काम भौतिकदृष्ट्या पूर्ण होऊनही मोर्शी तालुक्यातील दापोरी येथील पाणी पुरवठा योजनेला महावितरण कंपनी तर्फे वीज जोडणीच मिळत नसल्यामुळे गावाला पाणी पुरवठा सुरळीत होत नसल्याचा आरोप ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी केला आहे. मोर्शी तालुक्यातील ग्राम पंचायत कार्यालय दापोरी येथील नवीन पाणी पुरवठा योजना मंजूर झालेली असून त्या योजनेचे काम पूर्ण झालेले असून महावितरण कंपनीकडे मागील १ वर्षापासून सार्वजनिक पाणी पुरवठा योजनेचे कनेक्शन सुरु करून पाणी पुरवठा सुरळीत चालू ठेवण्याकरिता पाठपुरावा करून सुद्धा दापोरी येथील पाणी पुरवठा योजनेला आज पर्यंत वीज कनेक्शन सुरु करून मिळू शकलेले नसल्यामुळे दापोरी गावामध्ये पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झालेली आहे. दापोरी गावामध्ये २ ते ३ दिवसा नंतर पाणी पुरवठा केला जात असल्यामुळे गावामध्ये भयंकर पाणी टंचाई निर्माण झाल्यामुळे गावातील नागरिकांमध्ये रोष निर्माण होत आहे. शासनाने जल जीवन मिशन अंतर्गत कोट्यावधी रुपये मंजूर करून पाणी पुरवठा योजना उभी केलेली असतांना पाणी पुरवठा योजनेला वीज कनेक्शन मिळत नसल्यामुळे दापोरी येथील पाणी पुरवठा योजना पांढरा हत्ती ठरत असल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी महावितरण



कंपनीचे कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाचे उप विभागीय अभियंता, उप विभागीय अधिकारी, गट विकास अधिकारी यांना निवेदन देऊन दापोरी येथील सार्वजनिक पाणी पुरवठा योजनेच्या वीज कनेक्शन करिता सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देऊन ८ दिवसात वीज कनेक्शन देऊन सार्वजनिक पाणी पुरवठा सुरळीत सुरु करून दापोरी येथील हजारो नागरिकांची भीषण पाणी समस्या निकली काढण्याची मागणी केली आहे. ग्रामविकास विभागाने पंधराव्या वित्त आयोगाच्या शिल्लक निधीतून त्यांचे थकित वीजबिल भरण्यास परवानगी दिली. मात्र ग्रामपंचायतींनी आधीच या निधीतून विकास आराखडे तयार केले असल्यामुळे निधी खर्चात बदल करायचा असल्यास त्या आराखड्यातील काम बदल करणे गरजेचे आहे. विकास आराखड्यातील बदल करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत. त्यामुळे आराखड्यातील काम बदलाचे प्रस्ताव तयार करणे, त्याला ग्रामसभेची, पंचायत समितीची मंजुरी घेऊन तो प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे पाठवणे या कामामध्ये बराच वेळ जात असल्यामुळे ग्रामपंचायतींच्या आराखड्यातील कामांचे बदल होऊ शकत नाहीत. त्यामूळे ग्रामपंचायत थकित वीजबिल भरण्यास तयार नसल्याचे दिसत आहे. यामुळे जल जीवन मिशन योजना भौतिकदृष्ट्या पूर्ण होऊनही या योजनांद्वारे संबंधित गावांना वीजजोडणी मिळत नसल्यामुळे पाणीपुरवठा होऊ शकत नसल्याची खंत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांनी व्यक्त केली असून शासनाने या गंभीर समस्येकडे लक्ष केंद्रित करून ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजनांचे थकीत वीजबिल भरण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याची मागणी शासनाकडे रेटून धरली आहे.

# मुंबईत हायअलर्ट! दहशतवादी हल्ला, व्हिआयपी व्यक्ती होऊ शकतात लक्ष्य; ड्रोन वापरावर महिनाभर बंदी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ मुंबई**

मुंबई पोलिसांनी शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून महत्वाचा निर्णय घेतला आहे. मुंबईत पुढील महिनाभरासाठी ड्रोन, रिमोट-कंट्रोल मायक्रोलाइट एअरक्राफ्ट, पॅरा ग्लायडर आणि हॉट एअर बलून उडवण्यावर बंदी घातली आहे. मुंबई पोलिसांनी याबाबतच परिपत्रकच जारी केलं आहे. ही बंदी उद्या ४ एप्रिल २०२५ पासून लागू होणार आहे. जी पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत राहील.

पोलीस आयुक्तालयाकडून जारी करण्यात आलेल्या पत्रकानुसार, दहशतवादी किंवा राष्ट्रविरोधी घटक ड्रोन,



रिमोट-कंट्रोल मायक्रोलाइट एअरक्राफ्ट, पॅरा ग्लायडर आणि हॉट एअर बलूनचा वापर करुन दहशतवादी हल्ला तसंच शहरातील ततखझ व्यक्तींना लक्ष्य करण्यासाठी करू शकतात. मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक जीवन धोक्यात आणू शकतात. शहरातील गर्दींची ठिकाणं देखील लक्ष्य केली जाऊ शकतात. याच अनुषंगाने पोलिसांनी या सर्व प्रकारच्या ड्रोन वापरावर बंदी घातली आहे.

**उल्लंघन झाल्यास होईल कारवाई**

मुंबई पोलिसांचे अधिकार क्षेत्र आणि डीसीपीच्या परवानगीविना ड्रोन, रिमोट कंट्रोल ऑपरेटेड मायक्रोलाइट एअरक्राफ्ट, पॅराग्लाइडर वापरला गेल्यास कडक कारवाई केली जाईल, असंही नमूद करण्यात आलं आहे. या आदेशाचं उल्लंघन करणाऱ्यांविरोधात भारतीय न्यायसंहिता २२३ नुसार कारवाई केली जाणार आहे.

# 'फोर्सवन'चे प्रमुख एडीजी कृष्णप्रकाश यांनी घेतली बैठक २००६ ते २००७ दरम्यान होते अमरावतीचे एसपी

**विदर्भ प्रजसत्ताक दि. ४अमरावती**

दहशतवादाशी मुकाबला करण्यासाठी उभारण्यात आलेल्या 'फोर्स वन'चे प्रमुख अपर पोलिस महासंचालक कृष्णप्रकाश यांनी गुरुवारी (दि. ३) दुपारी पोलिस आयुक्तालय गाठून पोलिस अधिकाऱ्यांशी चर्चा केली. पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, कल्पना बारवकर व सागर पाटील यांनी त्यांचे



स्वागत केले. पोलिस अधीक्षक विशाल आनंद या वेळी उपस्थित होते. कृष्णप्रकाश यांना शहर पोलिस आयुक्तालयाच्या प्रांगणात सलामी देखील देण्यात आली. त्यानंतर अप्पर पोलिस महासंचालक कृष्णप्रकाश यांनी पोलिस आयुक्तालयात आढावा बैठक घेतली. महाराष्ट्र सरकारने १६ वर्षांपूर्वी एनएसजीच्या धर्तीवर राज्यात फोर्स वन स्थापनेचा निर्णय घेतला. त्यासाठी पोलिस दलातील निवडक कमांडो कठीण प्रशिक्षणासाठी निवडण्यात आले. आंतरराष्ट्रीय दर्जाचे फिजिकल आणि मेंटल ट्रेनिंग घेतलेली ३५० जवानांची ही फौज देशातील अन्य सुरक्षाबलांमध्ये उजवी ठरत आहे. केवळ देशातीलच नव्हे तर विदेशातील कमांडोंनाही प्रशिक्षण देण्याचा मान या फोर्सने मिळवला असल्याची माहिती कृष्णप्रकाश यांनी दिली. या वेळी अमरावती ग्रामीण पोलिस अधीक्षक असतानाच्या काही आठवणींना सुद्धा कृष्णप्रकाश यांनी उजाळा दिला.

# अधिकार अभिलेख उपअधीक्षक कार्यालयात भू-प्रणाम केंद्राचा शुभारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ४ अकोला**

राज्याचे केंद्र मंत्री चंद्रशेखर एकत्र आले. हे अकोल्याचा समावेश असून, येथील केंद्राचे व्हर्च्युअल उद्घाटन मान्य करण्यात आले. जिला अधिकार अभिलेख अधिक्षक भारती खंडेलवाल यांच्या मार्गदर्शनात भू प्रणाम केंद्र कार्यरत आहे. तटबंदी अभिलेख उपअधीक्षक पंकज पवार सत्तेचे कर्मचारी, नागरिक उपस्थित होते

नागरीकांसाठी केंद्रात सेतू सेवा केंद्रात कार्यान्वित करण्यात आली असून, सर्व प्रकारची अभिलेख आलेली सर्व सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. पहिल्या उत्सवात आली ३० कार्यालये निवड. अकोला कार्यालयाचा समावेश आहे. नागरिकांच्या सुविधेसाठी स्वागत कक्ष, अभ्यागत कक्ष, स्वच्छता गृह, सीसीटीव्ही, सूचनाफलक, फर्निचर, संगणकीय सुविधा आहेत. विविध फलक माहितीसाठी आवश्यक आहेत.

# अहिरवाडा येथील स्वयंभू जगदंबा भवानी मंदिरात चैत्र नवरात्रोत्सव : दीपज्योतसह ६ एप्रिल पर्यंत विविध कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४ कुऱ्हा**

आर्वी तालुक्यातील अहिरवाडा येथील स्वयंभू पुरातन जगदंबा भवानी मंदिरात ३० मार्चपासून सुरू झालेल्या चैत्र नवरात्रोत्सवात दररोज कार्यक्रम सुरू आहेत. ३० मार्चला सकाळी ७ ते ८.३० वा. आईचा अभिषेक वर्धेचे खा. अमर काळे यांच्या हस्ते, तर सकाळी ८.३० ते ९ वाजता जगदंबा भवानी देवस्थानाचे अध्यक्ष बाबू इंगोले यांच्या हस्ते महापूजा व घट स्थापना, सकाळी ९ ते १०.३० या वेळेत सार्वजनिक दीपज्योती प्रज्वलन सदस्य जय नारायण चांडक व उपाध्यक्ष दिवाकर यांच्या हस्ते झाले. गुरुदेव सेवा मंडळ अहिरवाडा रामदास शिंदे व वर्षा इथापे व संचाच्या वतीने रात्री ९ ते १० या वेळेत भजन



व देवीचे जागरण कार्यक्रम झाला.

५ एप्रिलला सकाळी ७ ते ८ या वेळेत सूरज सोटे आर्वी यांच्या हस्ते देवीची आरती व पाद्यपूजा. ११ ते दुपारी २ या वेळेत जागृती महिला भजन मंडळ राजापूर कविता दाऊतपुरे व संचाच्या वतीने भजन. सायं. ५ वाजता जगदंबा भवानी मातेची पालखी सोहळा मिरवणूक काढण्यात येणार आहे. रात्री १० वा. होमपूजा सूर्योदयापर्यंत प्रवीण गाडगे महाराज शास्त्री तळेगाव शा.प. यांच्या मार्गदर्शनात होणार आहे. ६ एप्रिलला सकाळी ६ ते ८ या वेळेत बाळूभाऊ इंगोले यांच्या हस्ते अभिषेक, ११ ते दुपारी १२ या वेळेत भागवताचार्य विजय महाराज गव्हाणे यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. दुपारी २.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत महाप्रसाद वितरण होईल. सायंकाळी ६ वाजता विश्वस्त कमिटी व वारकरी यांच्या हस्ते दीप विसर्जन होईल. भाविकांनी काल्याच्या कीर्तनाचा व महाप्रसाद, दीप विसर्जन सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आव्हान विश्वस्त मंडळ जगदंबा भवानी देवस्थान अहिरवाडा यांनी केले आहे.

# श्री विठोबा संस्थान मार्फत उद्याला भव्य रक्तदान शिबीर

## डॉ. सदानंदजी बर्मा ब्लड बँक,परतवाडा यांच्या सौजन्याने होणार रक्तसंकलन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४चांदूर रेल्वे**

तालुक्यातील प्रसिद्ध असलेले तीर्थक्षेत्र श्री क्षेत्र सावंगा विठोबा येथे गुढीपाडवा - रामनवमी यात्रा महोत्सव सुरु असताना संस्थानने दैनंदिन कार्यक्रम सुरु असताना संस्थान सामाजिक उपक्रम देखील राबवत आहे.दिनांक ०५/०४/२०२५ शनिवारला सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत सांस्कृतिक भवन मध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, श्री विठोबा




संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान श्री क्षेत्र सावंगा विठोबा आणि परतवाडा येथील डॉ. सदानंदजी बर्मा ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने हे रक्तदान शिबीर आयोजित केले असून संस्थानचे अध्यक्ष श्री पुंजाराम वै.नेमाडे (गुरुजी) यांच्या प्रमुख मार्गदर्शनात व उपाध्यक्ष श्री कृपासागर रा.राऊत, सचिव श्री अशोक ह.सोनवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे.सदर शिबीराचे रक्त संकलन सदर ब्लड बँकची तज्ञ चमु करणार असून रक्तदानास इच्छुकांनी मो. क्र ९९७०५०१८९८, ९४०३६२१६०० वर संपर्क करून नाव नोंद करावे तसेच संस्थानच्या देणगी कक्षावर सुद्धा नाव नोंदणी सुरु असल्याचे संस्थानच्या विश्वस्त मंडळाने केले आहे.

# संचालनालयाचे निर्देश, रोजगार, स्वयंरोजगाराची संपूर्ण माहिती मिळणार

## आयटीआयतील प्रवेश प्रक्रियेच्या माहितीसाठी आता समुपदेशन केंद्र

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

दहावीच्या परीक्षा १७ मार्चला संपल्या आहेत. यंदा परीक्षा लवकर झाल्याने औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (आयटीआय) प्रवेशाची लगबग सुरु झाली आहे. विद्यार्थी, पालकांसाठी समुपदेशन कक्षाची स्थापना करण्याचे निर्देश व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने संस्थांना दिले आहेत.या संदर्भात सूत्रांकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार



केंद्रातून प्रवेश घेताना येणार्या समस्यांचे निराकरण करण्यात येत आहे. संस्थेतील प्रवेशासाठी लागणारी कागदपत्रे, संस्थेत चालू अभ्यासक्रमांची माहिती व्यवसायाचाकालावधी व विद्यार्थ्यांना प्रवेशांमध्ये येणार्या अडचणीं संबंधी माहिती देण्यात येणार आहे. राज्यभरात ४९९ शासकिय आयटीआय आहे. तर खासगीची संख्या ५०५ आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे दहावीच्या परीक्षा १७ मार्च रोजी संपल्या. संचालनालयाने प्रशिक्षण राज्यातील आयटीआय संस्थांना प्रवेश प्रक्रियेची माहिती देण्यासाठी समुपदेशन केंद्र सुरु करण्याचे निर्देश दिले आहे. सकाळी १० ते ११ या वेळेत समुपदेशन केंद्र सुरु राहणार आहे. आयटीआय मध्येच प्रवेश प्रक्रिया समुपदेशनासाठी शिल्प निदेशकांची नेमणूक करण्यात आली आल्याचे अधिकार्यांनी सांगितले, अशी माहिती एका शासकीय प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवण्यात आली.

**लवकर ट्रेडनुसार डिरेक्टरी प्रकाशित होणार**

यंदा दहावीच्या परीक्षा लवकर झाल्याने निकालही लवकरच जाहीर होणार आहे. त्या अनुषंगाने समुपदेशन कक्ष स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ट्रेडनुसार डिरेक्टरी प्रकाशित करण्यात येणार आहे. यात ट्रेड काय आहेत. त्याचे फायदे करिअर संधी, विद्यार्थी, पालकांना प्रवेशासंबंधीची माहिती देण्यात येईल, अशी माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली आहे.

# संत गाडगे बाबांची दशसूत्रे व ग्रामविकास विषयावर सरपंचांची एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संत गाडगे बाबा अध्यासन केंद्र व महाराष्ट्र प्रदेश सरपंच पक्षाच्या संयुक्त विद्यमाने 'संत गाडगे बाबांची दशसूत्रे व ग्रामविकास' या विषयावर सरपंचांसाठी एकदिवसीय कार्यशाळा मोठला उत्साहात संपन्न झाला. कार्यशाळेच्या द्वितीय सत्राच्या अध्यक्षस्थानी जिल्ह्याच्या स्थानिक सदस्य श्री प्रकाशदा साबळे, प्रमुख




अतिथी म्हणून कॅ. वसंतराव शेतकरी स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड. निलेश हेलोंडे पाटील, महाराष्ट्र प्रदेश सरपंच केंद्राचे अध्यक्ष गजानन बोंडे, संत गाडगे बाबा अध्यासनप्रमुख डॉ. दिलीप काळे, अंजनगाव सुरजी पंचायतीचे मुख्यमंत्री व कसबेगव्हाण ग्रा.पं. चे सरपंच श्री शशिकांत मंगळे, श्री देवा पाचभाई, चंद्रपूर, श्री राजेंद्र कराळे, रुपेश ठाकरे, राजेंद्र सरोदे उपस्थित होते.

त्यांनी सांगितल्याप्रमाणे, तलाव व विकासात्मक कामाच गावी, समस्याग्रस्त समस्याग्रस्त शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, त्यांना सरपंच करून त्यांना लाभ द्यावा, असे आवाहन श्री. शेतकरी स्वाव न्याय अंतर्गत वैरणचालंबन लाभार्थी, पांदण लोकांच्या अत्यंत गरजेच्या महिलांना उत्पादन करण्यासाठी प्रशिक्षण, त्याच्या पीडित कुटुंबांना मदत करण्यासाठी गावातील विविध बाबींना मदत करण्याचे आणि मार्गदर्शन करण्यासाठी आम्ही पोलीस घेत आहोत असे मत आहे. वसंतराव शेतकरी स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड. निलेश हेंडेलो पाटील यांनी व्यक्त केले. सदर कार्यशाळेत विविध गावातील सरपंचांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# समता पंधरवडा जात प्रमाणपत्राळणीची विशेष मोहिम; सार्वजनिक अर्ज सादर करा

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ४ अमरावती**


भारतरत्न डॉ. सामाजिक सामाजिक जंयती न्याय व विशेष मदत विभागामार्फत दि. १ ते १४ एप्रिल २०२५ या कारणास्तव जात प्रमाणपत्र पडताळणीची विशेष मोहिम राबता येत आहे. समता पंधरवडा वातावरणत इयत्ता इ. ११ वी व १२ वी विज्ञानातील सन २०२५-२६ मध्ये प्रवेशित सर्व मागासवर्गीय परीक्षानी सीटी मार्फत व्यावसायिक अभ्याक्रमात प्रवेश घेणे तसेच डिप्लोमा तृतीय वर्षामध्ये शिकत असलेल्या परीक्षानी समता पंधरवडा शिबिराचा लाभार्थी उमेदवारी अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा प्रमाणपत्र तपासाणी उपायुक्त जयंत यांनी केले आहे.

# राज्याच्या वन मंत्रालयात वनाधिकाऱ्यांच्या बदल्यांमध्ये 'आनंदी आनंद'

## व्हॉट्सप व्हॉइस कॉलद्वारे मेसेज : बदलीपात्र आरएफओंना आमदारांच्या शिफारस पत्राची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती ३६**

मंत्रालयातील वनविभागाचे बदली व पदस्थापनेशी संबंधित आस्थापनेवर एका बड्या अधिकाऱ्यांनी तर त्यांची झालेली बदली विशेष प्रयत्न करून थांबवली आहे. त्यामुळे वनविभागात आजच्या घडीला सर्वत्र 'आनंदी आनंद' असल्याचे चित्र आहे, तर 'भगवान'कडे सर्व कारभार 'भगवान भरोसे' सुरू आहे.



प्रत्येक कामासाठी 'लक्ष्मीदर्शन' गरजेचे असल्याने बदलीपात्र वनाधिकाऱ्यांची गळचेपी होत असल्याची ओरड आहे.

मागील वर्षी २७० अधिकाऱ्यांची वनपरिक्षेत्र अधिकारी ते सहायक वनसंरक्षक या पदावर पदोन्नती प्रक्रिया पूर्ण झाली होती. यामध्ये तत्कालीन मंत्र्यांचे खासगी सचिव, विशेष कार्यकारी अधिकारी, मंत्रालयातील संबंधित अवर सचिव व उपसचिवांनी प्रचंड 'श्रम' घेतले. क्षेत्रीयस्तरावरील काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून वनाधिकाऱ्यांच्या पदोन्नतीचे हे सोपस्कार सुकरपणे आटोपले. मात्र आता वनपरिक्षेत्र अधिकारी संवर्गातील बदली व पदस्थापनेतही मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार निश्चित झाल्याने

> पुढील काळात काही विभागीय वनाधिकारी पदोन्नतीचा यादीत आहेत. त्यामुळेच अशा डीएफओंची माहिती गोळा केली जात आहे. पदे रिक्त झाल्यानंतरच डीएफओंना पदोन्नती दिली जाईल. अन्यथा चारच डीएफओंना पदोन्नती दिली जाणार आहे. आरएफओंच्या बदली, पदोन्नतीचे प्रस्ताव यायचे आहेत.
>
> **-आनंदा शेंडगे, अपर सचिव, वन मंत्रालय.**

याबाबत मंत्रालय पातळीवर कार्यवाही सुरू झाल्याची माहिती सूत्राकडून मिळाली आहे. प्रादेशिक व वन्यजीव शाखेतील कार्यकारी पदासाठी आरएफओंमध्ये स्पर्धा असल्याचे चित्र वनविभागात दिसून येत आहे.

**व्हॉट्सप व्हॉइस कॉल अन् डीएफओंच्या मंत्रालयीन वाऱ्या**

वनविभागात सध्याही विभागीय वनाधिकारी संवर्गात अजून पदे रिक्त नसतानाही मंत्रालयातील बडे अधिकारी विचार क्षेत्रातील अधिकाऱ्यांना व्हॉट्सप व्हॉइस कॉल करून भेटीच्या आमंत्रण देत आहेत. त्यामुळे बऱ्याच अधिकाऱ्यांच्या मुंबई वाऱ्या सुरू झालेल्या आहेत. क्षेत्रीय पातळीवरील परिस्थितीचा कुठलाही गंध नसलेले हे मंत्रालयातील अधिकारी क्षेत्रीय अधिकाऱ्यांचा छळ करण्यात मात्र पटाईत आहेत.

# नांदेड ट्रक्टर ट्रॉली विहिरीत पडल्याने दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना पाच लाखांचे अर्थसाहाय्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि. ४ मुंबई**

नांदेड आमदार आसेगाव येथे आज ११ महिला मजुरांना पाहीले ट्रॅक्टर ट्रॉली विहिरीत टाकून दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री मदत विजयी पाच लाखांचे अर्थसाहाय्य घडले.

मार्ग काही महिलांची संपर्काची घटना आहे , अशी भावना व्यक्त करून मुख्यमंत्री श्री. गड यांनी श्रध्दांजली अर्पण करत , त्यांच्या कुटुंबियांशी संवेदना व्यक्त केली आहे. हिंगोली निवडक गुंजगाव येथील महिला आणि शेतिकामासाठी त्या जात आहेत.

त्या विहिरीतून महिलांना बाहेरचे काम युद्धपातळीवर वेगात काढण्याचे काम आले. निवासी उपजिल्हाधिकारी , अतिरिक्त पोलिस अधीक्षक यासह संपूर्ण यंत्रणा घटनास्थळी आहे. तीन महिलांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. हिंगोली आणि नांदेड दोन्ही प्रशासनाच्या संपर्कात माहिती मुख्यमंत्र्यानी दिली आहे.

# रामनवमी निमित्य रविवारी भव्य दिव्य निघणार राम लल्लाची शोभायात्रा

## शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण राहणार श्री शामखाटू नरेश बाबांचे भव्य दरबार

## रामरथ, ढोलताशा पथक, वारकरी दिंडी, आदिवासी नृत्य : शहर होणार भगवामय



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

अमरावती शहरातील १९८५ पासून सुरू असलेली मानाची शोभायात्रा दर वर्षी प्रमाणे श्री राम नवमी शोभायात्रा समिती द्वारा आयोजित श्री राम नवमी चैत्र शुक्ल पक्ष नवमी कलियुग वर्ष ५१२७ रविवार दिनांक ६ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ४:३० वाजता श्री राम नवमीचे मुहूर्तावर भव्य शोभायात्रेचे भव्य दिव्य असे आयोजन करण्यात आले आहे. शोभायात्रेच्या यशस्वीते करिता समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच दिनांक २९ मार्च २०२५ ला श्री राम नवमी शोभायात्रेचे संपर्क कार्यालयाचे उदघाटन साधू संताच्या आशिर्वादाने संपूर्ण कार्यकारिणी च्या उपस्थिती मधे संपन्न झाले असल्याची माहिती आज पत्रकार परिषदेत आयोजन समितीच्या वतीने देण्यात आली.


रविवारी दिनांक ६ एप्रिल २०२५ रोजी प. पु. श्री सीतारामबाबा मंदिर प्रांगण, बालाजी प्लॉट दुपारी ४:३० वाजता पूजेचे मुख्य यजमान सौ. निकिता व श्री जयेशजी राजे पवार यांच्या हस्ते श्री राम दरबाराचे पूजन व महाआरती करून उपस्थित प. पु. संत महंतांचे मार्गदर्शन व आशिर्वचन घेऊन ही शोभायात्रा सायंकाळी ५:३० वाजता प्रारंभ होईल.

या शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण श्री शामखाटू नरेश बाबांचे भव्य दरबार तसेच रामरथ, ढोलताशा पथक, वारकरी दिंडी, आदिवासी नृत्य, बंजो, तसेच सामाजिक संदेश देणाऱ्या विविध झाकी, हरिपाठ मंडळ, साहसी खेळ महापुरुषांच्या प्रतिमा हे या शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण राहणार आहे.

या शोभायात्रेच्या सुरक्षेसाठी बजरंग दलाचे २५० ते ३०० बजरंगी तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी दुर्गवहिणीच्या १०० ते १५० दुर्गा राहतील शोभायात्रेच्या स्वागता साठी संपूर्ण शहर हे ध्वज पथका लावून भगवामय करण्यात आले आहे.

ही शोभायात्रा बालाजी प्लॉट येथून प्रारंभ होऊन राजापेठ, राजकमल, श्याम चौक, जयस्तंभ, सरोज चौक, जवाहरगेट, मार्गे श्री गजानन महाराज मंदिर, वकील लाइन, गांधी चौक येथे श्री राम दरबाराचे आरती करून समापन करण्यात येईल. शोभायात्रेच्या मार्गा वर ठीक ठिकाणी प्रसाद वाटप तसेच शोभायात्रेच्या मार्गाने आपापल्या घरा व प्रतिष्ठाना समोर रंगोली काढून, दिवे लावून, व पुष्पवर्षा करून शोभायात्रेचे स्वागत करण्यात येणार आहे. तसेच शोभायात्रेला सर्व हिंदू बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विश्व हिंदू परिषद, बजरंग दल श्रीराम नवमी शोभायात्रा समिती द्वारे करण्यात आले आहे.अशी माहिती श्रीराम नवमी शोभायात्रा समिती द्वारा कळविण्यात आले आहे. या वेळी रोहितजी देशमुख, दिलीपभाई पोपट, प्रशांतजी देशपांडे, श्रीमती अनुपमाताई तापडिया लड्डा, सौ. विजयाताई सांगावार, बंटीजी पारवाणी, विशालजी कुलकर्णी, अनिलजी साहू, सुधीरजी बोपुलकर, कन्हेयाजी मित्तल, रविराजजी जयेशजी राजे, राजीवजी देशमुख, सिध्दुजी सोलंकी, अनिलजी शर्मा, त्रिदेवजी डेंडवाल, विजयी खडसे, धर्मेंद्रजी गुप्ता, सतीशजी कुरील, गायत्रीताई निलगिरे उपस्थित होते.

# नेरपिंगळाईत पाणी टंचाईचे चटके; सावरखेड रस्त्यांवर शेकडो लिटर पाण्याची नासाडी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ नेरपिंगळाई**

गावात सहा दिवसा आड पाच दिवसा पाणी पूरवठा. एकी कडे पाणी टंचाईचे चटके तर दुसरीकडे नेरपिंगळाई सारखेड रस्त्यांवर लिकिज मधुन शेकडो लिटर पाण्याची नासाडी ग्रामपंचायत प्रशासन तेरी भी चूप मेरी चूप या पाण्या कडे लिकिज कडे हितचिंतक बघतात टूकुर टूकुरनेरपिंगळाई गावात सर्वात मोठी १७सदस्य असणारी ग्रामपंचायत असून त्याच्या मार्फत गावातील साफ सफाई. नाली सफाई व अन्य कामे पाण्याचे नियोजन ची जबाबदारी असून नुकताच उन्हाळा सुरू झाला असून चाहूल लागताच गावातील शिक्षक कॉलनी मधली टाकी आजारी पडली दुरुस्ती करायला योग्यनियोजन नसल्याने किंवा अन्य कारणा मुळे गावात कधी सहा दिवसा आड तर कधी पाच दिवसा आड पाणी पुरवठा ग्रामपंचायत मार्फत केला जातो एकी कडे भीषण पाणी टंचाईचे चटके तर दुसरी कडे नेरपिंगळाई सारखेड रस्त्यावरुन येणाऱ्या पाईप लाइनच्या लिकेज मधुन गेल्या अनेक दिवसा पासुन शेकडो लिटर पाण्याची नासाडी होत असून नागरिकांचे हाल होत आहे. त्यात आता गावा मध्ये एक वेगळी चर्चा ऐकला येत आहे याच रस्त्यांवर प्रशासन मधले व त्याचा मागे त्याचा रोष करून पुढे त्याच्या सुख दुःखात उभे राहून तारीफ पे तारीफ करणारे हितचिंतक सुद्धा या रस्त्यावरुन येजा करतात मात्र शेकडो लिटर पाण्याची नासाडी होतअसल्याचे त्याच्या निर्देशनास आले नाही ही शोकांतिका आहे या पाण्याच्या नासाडी कडे प्रशासनाने लक्ष केंद्रित करावे अशी मागणी जनता करिता आहे.

# प्रशांत कोरटकर याचा जिल्हा न्यायालयात जामिनासाठी अर्ज, सुनावणीची तारीख निश्चित नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४कोल्हापूर**

महापुरुषांचा अवमान आणि इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांना धमकावणे, या प्रकरणातील नागपुरातील आरोपी प्रशांत कोरटकर याचे वकील सौरभ घाग यांनी गुरुवारी जिल्हा व सत्र न्यायालयात जामिनासाठी अपील अर्ज केला. यावर उद्या, शनिवारी किंवा सोमवारी दोन्ही बाजूंच्या वकिलांकडून युक्तिवाद होण्याची शक्यता आहे.

चौथे सहदिवाणी न्यायाधीश एस. एस. तट यांनी मंगळवारी कोरटकर याचा जामीन अर्ज नामंजूर केला होता. त्यामुळे कोरटकर याचा मुक्काम कळंबा कारागृहात वाढला आहे. नवीन अर्जावर सरकारी वकील, पोलिस विभागातील तपास अधिकारी, फिर्यादी इंद्रजित सावंत यांचे म्हणणे घेतले जाणार आहे. त्यानंतर जामीनवर निर्णय होणार आहे.जामीन अर्जाची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायालयात कोणत्या न्यायाधीशांसमोर चालणार हे निश्चित झालेले नाही. हे निश्चित झाल्यानंतर सुनावणीची तारीख निश्चित होईल.

# गाळ, माती, मुरूम, दगड मिळणार विनामुल्य : राज्य सरकारची 'मातोश्री ग्रामसमृद्धी पाणंद रस्ते योजना'

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

शेतकऱ्याला शेतापर्यंत पोचण्यासह कृषी यंत्रसामग्री सहज वाहून नेता यावी यासाठी पाणंद रस्ते अत्यंत महत्त्वाचे असतात. मात्र, अनेक ठिकाणी पाणंद रस्त्यांची अवस्था खराब असून, त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीत जाण्यास अडचणी येतात. याच पार्श्वभूमीवर सरकारने 'मातोश्री ग्रामसमृद्धी पाणंद रस्ते योजना' राबवण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय ३ एप्रिल रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे.

राज्यातील शेतकरी, घरकुल लाभार्थी आणि शासकीय बांधकामांसाठी शेततळी, पाझर तलाव, महसूली नाले आणि बंधाऱ्यांमधून निघणारा गाळ, माती, मुरूम आणि दगड विनामूल्य मिळणार आहे. या निर्णयामुळे शेतरस्ते सुधारण्यासाठी लागणारा मुरूम आणि माती शेतकऱ्यांना सहज उपलब्ध होईल, ज्यामुळे



शेतीला जोडणारे रस्ते मजबूत होतील.

**महामार्गाएवढेच शेतरस्ते महत्त्वाचे**

महामार्ग विकसित करण्यासारखेच शेतरस्त्यांच्या विकासालाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. शेतापर्यंत रस्ता असल्यास शेतमाल वाहतूक करणे सोपे होते आणि शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या अवजड यंत्रसामग्रीचा वापरही सहज शक्य होतो.

**पाणंद रस्त्यांचा विकासाला बळकटी**

शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतांमध्ये जाण्यासाठी सोपा मार्ग उपलब्ध होणार असून, शेतीचे उत्पादन आणि कार्यक्षमता वाढणार आहे. यामुळे शेतकऱ्यांचे अर्थकारण बळकट होईल आणि गावांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल. हा निर्णय शेतकरी, ग्रामपंचायती आणि संपूर्ण कृषी क्षेत्रासाठी मोठा दिलासा देणारा ठरणार आहे.

# अवकाळी पावसामुळे भंडारा, यवतमाळ, वाशिममध्ये वीज कोसळून ४ ठार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४यवतमाळ**

दोन दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसाने गुरुवारी विदर्भाला जोरदार तडाखा दिला. वादळी पावसादरम्यान भंडारा, यवतमाळ व वाशिम जिल्ह्यात शेतकरी महिलेसह चौघांचा वीज कोसळून मृत्यू झाला. वीज कोसळल्याने बैल आणि शेळ्याही दगावल्या. वादळी पावसाने रब्बी धान, गहू, हरभरा, आंबा व भाजीपाल्याचे प्रचंड नुकसान झाले. घरांचीही पडझड झाली.


भंडारा जिल्ह्याच्या तुमसर तालुक्यात महिलेसह दोघांचा बळी गेला. तालुक्यातील पाथरी या गावी दुपारी १२ वाजताच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह पाऊस सुरू झाला. शेतात काम करून घरीत परत जाण्यासाठी निघालेले तिघे पावसापासून बचावाकरिता आंब्याच्या झाडाखाली बसले. दुर्दैवाने या झाडावरच वीज कोसळली. यात महिला व पुरुष शेतकरी जागीच ठार झाले. मनीषा भारत पुष्पतोडे (३२) व प्रमोद मनिराम नागपुरे (४२) असे मृतांची नावे आहेत. महिलेचे सासरे आसाराम पुष्पतोडे (५५) हे सुदैवाने बचावले.

दुसरी घटना यवतमाळ जिल्ह्याच्या मुकुटबन येथील आहे. सकाळपासून वादळी पावसाला सुरुवात झाली. यादरम्यान तालुक्यातील बंदी वाढोणा या गावातील शेतकरी वसंता नरसिंग चव्हाण (३८) हे सकाळी ९:३०च्या सुमारास शेतात काम करीत असताना त्यांच्या अंगावर वीज कोसळली. उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. याशिवाय वाशिम जिल्ह्यात हळद उकळण्याचे काम करत असताना अंगावर वीज पडून एक शेतमजूर मृत्युमुखी पडला. ही घटना गुरुवारी दुपारी ४ वाजता रिसोड तालुक्यातील कवठा शिवारात घडली. मृत शेतमजुराचे नाव चंद्रविलास काठोळे (४०) असे आहे.

# पीक कर्ज फेडण्यासाठी चक्क किडनी विक्रीला कर्जमाफीला शासनाच्या नकाराविरुद्ध आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४वाशिम**

पीक कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्याने चक्क स्वत:सह कुटुंबातील सदस्यांच्या किडनी व इतर अवयव विक्रीला काढल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.जिल्ह्यातील आडोळी येथील शेतकरी सतीश भागवत ईढोले यांनी वाशीम शहरातील बाजारपेठेत 'स्वस्त भावात माझ्यासह कुटुंबियांची किडनी व इतर अवयव विकत घ्या' असा फलक हातात घेऊन आंदोलन केले. या संदर्भात त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देखील पाठवले आहे.




विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करू, असे आश्वासन दिले होते. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्जमुक्त होण्याची आशा लागली होती. मात्र, निवडणुका झाल्यानंतर परिस्थितीत बदल झाला. नेत्यांचा सूर बदलला आहे. राज्याची सध्याची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांना कर्जमाफी देणे शक्य नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी ३१ मार्चपूर्वी बँकांचे पीक कर्ज फेडून टाकावे, असे वक्तव्य उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुद्धा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे वक्तव्य ही शासनाची भूमिका असल्याचे सांगितले. कर्जमाफीची अपेक्षा फोल ठरल्याने संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांमध्ये नाराजी व रोषाची भावना आहे. त्यातच पीक कर्ज वसुलीसाठी बँकांनी शेतकऱ्यांकडे तगादा सुरू केला आहे. अगोदरच नैसर्गिक संकटामुळे शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीचा सामना करावा लागला. त्यातच उत्पादित झालेल्या शेतमालाला बाजारपेठेत योग्य भाव मिळत नसल्याचे चित्र आहे. शेतकऱ्यांना पडलेल्या भावात आपला माल विक्री करून मोठे नुकसान सहन करावे लागत असल्याचे दिसून येते.

वाशीम जिल्ह्यातील आडोळी येथील शेतकरी सतीश भागवत ईढोले यांनी आक्रमक भूमिका घेत राज्य शासनाविरोधात आंदोलन केले. त्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवून संपूर्ण कुटुंबांतील सदस्यांची किडनी विकत घ्यावी, असे म्हटले आहे. शासनाकडून कर्जमाफी मिळणार नसल्याचे सांगण्यात आल्याने शेतकऱ्यांसमोर आत्महत्येशिवाय दुसरा कोणताही पर्याय राहिलेला नाही. जिल्ह्यात मागील वर्षभरात नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले. परिणामी, जिल्ह्यातील शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. त्यांच्याकडे कर्ज फेडण्यासाठी पैसे नाहीत आणि बँका वसुलीसाठी दबाव टाकत आहेत. त्यामुळे पीक कर्ज फेडण्यासाठी माझ्यासह कुटुंबातील सदस्यांच्या किडनी विकण्याचा निर्णय घेतल्याचे निवेदनात नमूद केले आहे. शेतकऱ्याच्या या भूमिकेची चांगली चर्चा होत आहे.

# सावधान! सार्वजनिक ठिकाणीअस्वच्छता केल्यास पाच हजारांपर्यंत दंड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणाऱ्यांना लगाम लावण्यासाठी महापालिका प्रशासनाने आता दंडात्मक कारवाई सुरू केली असून, उघड्यावर कचरा फेकणाऱ्यांवर जागीच कारवाई करण्यात येत आहे. कचऱ्याचे वर्गीकरण करून ते घंटागाडीत टाकण्याची व्यवस्था असताना सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करण्याचे प्रमाण वाढले होते. महापालिकेच्या स्वच्छता विभागाकडून ही कारवाई केली जात आहे.

शहरातील कचऱ्यामुळे आजार होत असल्याने नागरिकांनी इतर ठिकाणी कचरा टाकू नये, असे आवाहन महापालिकेने केले आहे. मात्र अनेक भागात अस्वच्छता दिसून येत होती. शहरातील विविध भागांत उघड्यावर कचरा टाकला जात असल्याने या कचऱ्याचा त्रास नागरिकांना होत आहे. याची दखल घेत महापालिकेचा स्वच्छता विभागाने आता थेट कारवाई सुरू केली आहे. महापालिकेच्या उपायुक्त डॉ. मेघना वासनकर यांनी कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश स्वच्छता विभागाला दिले होते.



आयुक्तांनी दिलेल्या आदेशानंतर स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांची पथके तयार करण्यात आली. ज्या भागात कचरा टाकला जातो. तेथे सकाळी आणि संध्याकाळी गस्त घातली जात आहे. सदर ठिकाणी कचरा टाकण्यात येऊ नये, यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करुन कचऱ्यामुळे होणाऱ्या आजारांची, तसेच शहराच्या विद्रुपीकरणाची माहिती नागरिकांना दिली जात आहे. महापालिकेने केलेल्या जनजागृतीनंतर देखील काही ठिकाणी नागरिक कचरा टाकत असल्याचे लक्षात आल्याने संबंधित नागरिकांवर कारवाई करुन त्यांच्याकडून दंड आकारण्यास सुरुवात करण्यात आली आहे, अशी माहिती महापालिका उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांनी दिली.

शहरातील महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीमध्ये कचरा टाकला जात असलेल्या जागांचा शोध घेण्यात आला असून तेथे कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. महापालिकेचे कर्मचारी तेथे जाऊन जनजागृती करत आहेत. महापालिकेच्या आवाहनाकडे दुर्लक्ष करत कचरा टाकणाऱ्यांना पहिल्यांदा समज दिली जाते. त्यानंतरही यामध्ये बदल न झाल्यास कचरा टाकणाऱ्यांकडून दंड घेतला जातो. सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणे या नियमाखाली हा दंड घेतला जात आहे. या नियमाखाली पाचशे ते पाच हजार रूपयांचा दंड घेण्याची तरतूद असल्याचे उपायुक्त डॉ. मेघना वासनकर यांनी सांगितले. यापुढील काळातही ही कारवाई सुरु राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, शहरातील ज्या ठिकाणी कचरा टाकण्यात आला, त्या जागा स्वच्छ करण्याची मोहीमदेखील महापालिकेने सुरू केली आहे. पुढील काही दिवस ही मोहीम देखील सुरु ठेवली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# बस बिघडल्यास त्याच तिकिटात करा आता एसी बसने प्रवास

## आता एसटी प्रवाशांना येणार नाही अडचण. सर्व आगारांना दिले आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एसटी बसचे ब्रेकडाऊन वाढले आहे. देखभाल-दुरुस्तीकडे दुर्लक्ष, निम्म दर्जाच्या साहीत्याचा वापर यामुळे हा प्रकार वाढला आहे. अपघातांची संख्याही अधिक आहे. याचा मनस्ताप प्रवाशांना सहन करावा लागतो.

मार्गावर फेल झालेल्या, अपघात झालेल्या साध्या बसचे प्रवासी घेण्यास उच्चश्रेणी बसचे चालक-वाहक टाळाटाळ करतात. आता हे चालणार नाही. असे महामंडळाने ठणकावले आहे. फेल झालेल्या साध्या बसच्या प्रवाशांना उच्चश्रेणी बसमध्ये घ्यावे लागेल. असे अलीकडेच एसटी महामंडळाने काढलेल्या परिपत्रकातून सूचित केले आहे, मार्गावर असलेल्या निमआराम, शयनयान, शिवशाही, शिवाई, शिवनेरी या उच्चश्रेणी बसच्या चालक-वाहकांनी फेल पडलेल्या साध्या बसेसच्या प्रवाशांना घ्यावे असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहेत. शिवाय साध्या बसच्या तिकीट दरातच ही सुविधा उपलब्ध करून द्यावी लागणार आहे. नागरिकांच्या वाढत्या तक्रारी लक्षात घेता महामंडळाने सर्व विभागांना आदेशाची कडक अंमलबजावणी करण्याचे सांगीतले आहे.अनेक प्रकारच्या बस एसटी महामंडळाच्या ताफ्यात आहेत. त्यात अश्वमेघ, शिवनेरी, शिवशाही, इलेक्ट्रिक यासारख्या एसटी बसेसचा यामध्ये समावेश आहे.पूर्वी ज्या श्रेणीची बस आहे, त्याच श्रेणीच्या बसमधून प्रवाशांना प्रवास करावा लागत होता.

आता या नियमात सुधारणा करण्यात आली आहे. कनिष्ठ श्रेणीच्या बसमधील प्रवाशांना यापुढे कोणत्याही वरिष्ठ श्रेणीच्या बसमधून प्रवास करता येईल.नव्या नियमानुसार आता साधी बस मार्गात फेल झाल्यास त्याचे तिकिट एसी बसमध्ये चालणार आहे.

**या बसचे तिकीट जास्त महाग**

एसटी महामंडळात आजघडीला अनेक श्रेणीच्या बस प्रवाशांच्या सेवेत कार्यरत आहेत, त्यात निमआराम, शयनयान, शिवशाही, शिवाई, शिवनेरी या बसचे तिकीट अधिक महाग आहेत.

